-:: प्र क र ण - ४ थे ::-

# सारणीकरण

# प्र क र ण - ४ थे

## सारणीकरण


४·१ प्रास्ताविक

(अ) वै· माहिती

४·२ वयोगट

४·३ लिंगभेदानुसार वर्गीकरण

४·४ लिंग व वयोगटानुसार वर्गीकरण

४·५ वैवाहिक दर्जा

४·६ लिंग व वैवाहिक दर्जा

४·७ धर्म व ज्ञान

४·८ शिक्षण

४·९ मातृभाषा

४·१० ऊसतोडणी व्यतिरिक्त व्यवसाय

४·११ जिल्हावार ऊसतोडणी कामगार

४·१२ मूळ गांव व कामाचे ठिकाण

४·१३ कारखाना

(ब) टोळी अथवा गटाचे स्वरूप

४·१४ गट व नातेवाईक कुटुंबे

४·१५ नातेवाईक कुटुंबे व भांडणे यांचा संबंध

४·१६ भांडणे, कारणे व प्रमाण

(क) कौटुंबिक माहिती व उपलब्ध सुखसोई

४·१७ मूळ गावाकडील कुटुंब प्रकार व सदस्य संख्या·

४·१८ कुटुंब प्रमुख

४·१९ कुटुंब सदस्य (वय व लिंग दर्जानुसार)

४·२० कुटुंब सदस्य व शिक्षण

४·२१ घर मालकी व स्वरुप

४·२२ उपलब्ध सुखसोई

४·२३ झोपडीत उजेडाची सोय·

४·२४ भांडी-कुंडी उपलब्धता·

४·२५ कामासाठी निवड

४·२६ देखरेख

४·२७ नातेसंबंध व श्रमविभाजन

४·२८ संकटकालीन मदत व कामगार अधिकारी

४·२९ संघटना परिचयाचे मार्ग

(ड) ऊसतोडणी कामगार - आर्थिक बाजू

४·३० शिल्लक रक्कम सुरक्षितता उपाय·

४·३१ मुकादमावरील विश्वास व शिक्षण

४·३२ उत्पन्न (कामाचे ठिकाणी)

४·३३ कर्ज साधने व प्रमाण

४·३४ कर्जाची मर्यादा

४·३५ कर्ज काढणेची कारणे

४·३६ कर्जाची कारणे व वयोगट

(इ) उसतोडणी कामगार व वैद्यकीय सुविधा

४·३७ वै·सुविधांची उपलब्धता

४·३८ शिक्षण व आरोग्य यांचे महत्व

४·३९ दुर्धर प्रसंगातून बचाव

४·४० कु·नि·शस्त्रक्रिया - कारणमिमांसा

(ई) इतर सामाजिक बाबी

४·४१ जातीभेद व शिक्षण

४·४२ धर्म-जादू व शिक्षण

४·४३ व्यसने आणि खर्च

४·४४ पत्रव्यवहार व पत्ता

४·४५ स्थानिक लोकांशी व्यवहार

४·४६ करमणुकीच्या सुविधा

# प्रकरण - ४ थे

## सारणीकरण

### ४·१ प्रास्ताविक :

ऊसतोडणी कामगारांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करताना ऊसतोडणी कामगाराला त्याच्या जीवनामध्ये येणा-या दैनंदिन समस्या त्यांच्या आर्थिक समस्या, समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून त्यांचे जीवन या बाबींच्याविषयी माहिती उपलब्ध झाली· ऊसतोडणी कामगार हे ख-या अर्थाने शेतमजूरच म्हणून गणले जाण्यास हरकत नाही· तरीपण ऊसतोडणी कामगारांच्या समस्या या शेतमजूरांच्या समस्यापेक्षा अधिक क्लिष्ट आहेत· शेतमजूर हा स्वत:च्या गावाच्या आसपास तरी काम मिळवत असतो· पण ऊसतोडणी कामगार हे मूळ गावापासून ब-याच दूरच्या अशा अंतरावर जाऊन काम करताना आढळतात· त्यामुळे ऊसतोडणी कामगारापुढे त्या त्या भिन्न भिन्न ठिकाणच्या सामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक परिस्थीतीमुळे "समस्या" निर्माण होतात·

आकलनात्मक प्रश्नावलीच्या सहाय्याने ब-याच महत्वाची अशी माहिती उपलब्ध करून घेता आली· उदा· ऊसतोडणी कामगाराचे मूळ गांव, मूळ गांवापासून कामाच्या ठिकाणापर्यंतचे अंतर त्याची संपूर्ण वैयक्तिक माहिती ( वय, शिक्षण, वैवाहिक दर्जा इ· ) ऊसतोडणी कामगारांची कौटुंबिक स्थिती, टोळीतील अथवा गटातील त्यांचे आपआपसातील संबंध, त्यांच्या कामाची

प्रत्यक्ष स्थिती मूळ गांवाकडील परिस्थीती, त्यांच्या आर्थिक समस्या, आरोग्यविषयक सुविधा व आणि इतर सामाजिक बाबी इत्यादी.

संशोधकाने प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन उत्तरदात्याना कोणतीही पूर्वसूचना न देता आकलनात्मक प्रश्नावलींच्या सहाय्याने मुलाखती घेतल्या. भिन्न भिन्न अशा १०० गटातील १०० व्यक्तींच्या कडून प्रश्नावलीद्वारे मुलाखती घेऊन माहिती संकलीत केली. मिळविलेल्या माहितीचे साध्या आणि छेदीत सारण्यामध्ये रुपांतर केले.

मिळविलेल्या माहितीचे निर्वचन आणि विश्लेषण पुढे दिलेल्या सारण्यांच्यावरुन लक्षात घेता येईल.


अ) वै. माहिती :

४.२ वयोगट :

सारणी क्रमांक १.

* वयोगट *

| अनुक्रमांक | वयोगट | शे. प्रमाण |
|---|---|---|
| १ | १८ ते २८ | ३८ |
| २ | २९ ते ३८ | ३९ |
| ३ | ३९ ते ४८ | २१ |
| ४ | ४९ ते ५८ | ०२ |
| ५ | ५८ चे वर | -- |
| | एकूण .. | १०० |


* वयोगटानुसार वर्गीकरण *
प्रमाण –
१ सें.मी. = २%
वयोगट

या सारणीमध्ये १८ ते २८ या वयोगटातील ३८% लोक आढळतात. २९ ते ३८ या वयोगटामध्ये ३९% लोक आढळतात. ३९ ते ४८ या वयोगटामध्ये २१% लोक आढळतात.

४९ ते ५८ या वयोगटामध्ये २% तर ५८ चे वरील वयोगटामध्ये हे प्रमाण शून्य आढळते. वरील सारणीमध्ये ऊसतोडणी कामगारांचे सर्वात जास्त प्रमाण ३९% हे वयोगट २९ ते ३८ या वयोगटात आढळते. तर सर्वात कमी म्हणजे फक्त २% प्रमाण ४९ ते ५८ वयोगटामध्ये आढळते. ५८चे वरील प्रमाण तर शून्य आहे. वयोगट १८ ते ३८ पर्यंत हे प्रमाण ७७% आहे. त्यानंतरचे प्रमाण फक्त २३% आहे.

येथे ओघवयात असे म्हणता येईल की वयोगट ३९ ते ४८ नंतर ऊसतोडणी कामगारांचे प्रमाण एकदम कमी होते. त्याचप्रमाणे वयोगट ४९ ते ५८ नंतर एकही ऊसतोडणी कामगार ऊसतोडणीचे काम करीत नाही. कारण वयोगट ४९ ते ५८ नंतर कामगारांची ऊसतोडणीसाठी लागणारी शा. कार्यक्षमताच शिल्लक रहात नाही.

## ४.३ लिंगभेदानुसार वर्गीकरण :

सारणी क्रमांक २.

* लिंग *

| अनुक्रमांक | लिंग | शे.प्रमाण |
|---|---|---|
| १ | पुरुष | ७९ |
| २ | स्त्रिया | २१ |

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

मिळविलेल्या माहितीनुसार लिंगभेदानुसार वर्गीकरण वरीलप्रमाणे करता आले. मुलाखती घेतलेल्या एकूण ऊसतोडणी कामगारापैकी ७९% प्रमाण पुरुषाचे आहे. तर स्त्रियांचे प्रमाण २१% आहे. हे वरील सारणीवरुन आढळून आले.


पुरुषांचे प्रमाण स्त्रियांच्या प्रमाणापेक्षा खूपच म्हणजे जवळ-जवळ चारपट जास्त आहे असे आढळून आले. स्त्रियांचे इतके कमी प्रमाण पहाता असे म्हणता येईल की, ऊसतोडणीचे काम स्त्रियांना न झेपणारे अशा स्वरुपाचे आहे.

## ४.४ लिंग व वयोगटानुसार वर्गीकरण :

सारणी क्रमांक ३.

* लिंग व वयोगट *

| अनुक्रमांक | वयोगट | पुरुष % | स्त्रिया % | एकूण % |
|---|---|---|---|---|
| १ | १८ ते २८ | २५ | १३ | ३८ |
| २ | २९ ते ३८ | ३३ | ०६ | ३९ |
| ३३ | ३९ ते ४८ | १९ | ०२ | २१ |
| ४ | ४९ ते ५८ | ०२ | ०० | ०२ |
| ५ | ५८ चे वर | ०० | ०० | ०० |
| | एकूण .. | ७९ | २१ | १०० |


* लिंग व वयोगट *
प्रमाण
१ सें.मी = २%
सूची -
पुरुष
स्त्रिया
१८ ते २८
२९ ते ३८
३९ ते ४८
४९ ते ५८
५९ चे वर
वयोगट

या सारणीमध्ये असे आढळते की वयोगट १८ ते २८ मध्ये पुरुष २५% तर स्त्रिया १३% असे एकूण ३८% प्रमाण आहे. २९ ते ३८ वयोगटामध्ये ३३% पुरुष व ६% स्त्रिया असे एकूण ३९% प्रमाण आढळते. वयोगट ३९ ते ४८ मध्ये १९% पुरुष तर २% स्त्रिया असे एकूण २१% प्रमाण आहे. ४९ ते ५८ वयोगटामध्ये पुरुषांचे प्रमाण फक्त २% तर स्त्रियांचे प्रमाण शून्य आहे. ५८ चे वरील गटात पुरुष व स्त्रिया या दोन्हीचेही प्रमाण शून्य आहे.

पुरुषांचे सर्वात जास्त प्रमाण ३३% हे २९ ते ३८ या वयोगटामध्ये आढळते. तर स्त्रियांचे सर्वात जास्त प्रमाण १३% हे १८ ते २८ या वयोगटामध्ये आढळते. पुरुषांचे सर्वात कमी प्रमाण २% हे वयोगट ४९ ते ५८ मध्ये आढळते. तर स्त्रियांचे सर्वात कमी प्रमाण २% हे वयोगट ३९ ते ४८ मध्ये आढळते.

येथे असे म्हणता येते की, वयोगट ४९ ते ५८ नंतर पुरुष आणि वयोगट ३९ ते ४८ नंतर स्त्रिया हे काम करुच शकत नाहीत. तसेच १८ ते २८ मध्येच स्त्रियांचे जास्त प्रमाण आहे. कारण या वयोगटातील स्त्रिया एकतरी नवविवाहीत असतात अकिंवा त्यांचेवर मुलांची जबाबदारी जास्त प्रमाणात नसते. वयोगट २९ ते ३८ मध्ये पुरुषांचे जास्त प्रमाण आहे. कारण विभक्त कुटुंब पध्दतीमुळे अथवा इतर अन्य कारणामुळे पुरुषांच्यावर या काळामध्ये कौटुंबिक जबाबदारी जास्त प्रमाणात पडत असावी.

४.५ वैवाहिक दर्जा :

सारणी क्रमांक ४

* वैवाहिक दर्जा *

| अनुक्रमांक | वैवाहिक दर्जा | शे. प्रमाण |
|---|---|---|
| १ | अविवाहीत | १२ |
| २ | विवाहित (स्त्री/पुरुष) | ८५ |
| ३ | विधवा | १ |
| ४ | विधुर | २ |
| ५ | अन्य | -- |
| | एकूण.. | १०० |


अविवाहीताचे प्रमाण १२% आढळते. विवाहितांचे प्रमाण ८५% आढळते. विधवा १% तर विधुर २% घटस्फोटीत अथवा अन्य यांचे प्रमाण शून्य आहे.

येथे विवाहितांचे प्रमाण हे सर्वात जास्त म्हणजे ८५% आहे. तर सर्वात कमी प्रमाण विधवा १% आहे. अर्थात स्त्रियांच्या संख्येच्या मानाने ते दुर्लक्षणीय नाही. हे कामगार कामावर घेतले जाताना त्यांची निवड जास्तीत जास्त " पती-पत्नी " अशांचीच निवड केली जाते.[१] त्यामुळे विवाहीतांचे प्रमाण जास्त आढळते.

उसतोडणी कामगारांच्यामध्ये विशेषत: पती-पत्नी अशा जोडींचीच निवड केली जाते.

## * वैवाहिक दर्जा व शेकडा प्रमाण. *

प्रमाण –
अ – शेकडा प्रमाण = १ से.मी. = ५ %
ब – वैवाहिक दर्जा.



## ४.६ लिंग व वैवाहिक दर्जा :


सारणी क्रमांक ५

* लिंग व वैवाहिक दर्जा *

| अनुक्रमांक | वैवाहिक दर्जा | पुरुष % | स्त्रिया % | एकूण % |
|---|---|---|---|---|
| १ | अविवाहित | १२ | - | १२ |
| २ | विवाहीत | ६५ | २० | ८५ |
| ३ | विधवा | -- | १ | १ |
| ४ | विधूर | २ | -- | २ |
| ५ | अन्य | -- | -- | -- |
| | एकूण | ७९ | २१ | १०० |

या सारणीमध्ये पुरुष ऊसतोडणी कामगारामध्ये विवाहित या दर्जामध्ये सर्वाधिक म्हणजे ६५% इतके प्रमाण आहे. तर येथेच स्त्रियांचेही प्रमाण सर्वाधिक म्हणजे २०% आहे. अविवाहितामध्ये स्त्रिया नाहीत तर पुरुषांचे प्रमाण १२% आहे. विधवा स्त्रि १ तर विधुर पुरुष २ आढळतात. घटस्फोटीतांचे प्रमाण अजिबात नाही. वरील सारणीमध्ये विवाहित या गटांमध्ये स्त्रि-पुरुषांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ८५% आहे. उरलेल्या १५% पैकी १२% अविवाहित आहेत. विवाहितांच्या ८५% प्रमाणावरुन ऊसतोडणी कामगार हे "कामावर येताना पती-पत्नी या जोडीवर येत असतात किंवा त्यांची निवड करताना "पती-पत्नी" अशी जोडीची निवड केली जात असते.

## * लिंग व वैवाहिक दर्जा *


प्रमाण -
अ - अो प्रमाण 1 सें मी = 5%
ब — वैवाहिक दर्जा
सूची -
पुरुष
स्त्रिया
आकडा प्रमाण (पुरुष व स्त्रिया)
१००
९५
९०
८५
८०
७५
७०
६५
६०
५५
५०
४५
४०
३५
३०
२५
२०
१५
१०
५
०
अविवाहित
विवाहित
विधवा
विधुर
अन्य
वैवाहिक दर्जा

स्त्रियांच्यामध्ये अविवाहित कोणीही आढळत नाही. अविवाहित स्त्रियांना अशा कामावर त्यांचे आई वडील अथवा भाऊ आणू शकतील. परंतु अशा धकाधकीच्या जीवनात तरुण अविवाहित स्त्रियांना आणणे धोक्याचे आहे. म्हणून स्त्रियांमध्ये अविवाहित कोणीही आढळत नाही. तसेच घटस्फोटित असेही कोणीच आढळत नाही. ऊसतोडणी कामगारांमध्ये घटस्फोट प्रमाण आढळून येत नाही, असे म्हणावे लागेल.

४.७ धर्म व ज्ञान :

सारणी क्रमांक ६

* धर्म व जातीनुसार वर्गीकरण *

| अनु-क्रमांक | धर्म | मराठा % | धनगर % | माळी % | लमाण % | वंजारी % | सणगर % | महार % | एकूण % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | हिंदू | ३७ | ५ | ३ | ३ | ३८ | २ | ५ | ९३ |
| २ | मुस्लिम | - | - | - | - | - | - | - | ०१ |
| ३ | अन्य(नवबौद्ध) | - | - | - | - | - | - | - | ०६ |
| | एकूण.. | ३७ | ५ | ३ | ३ | ३८ | २ | ५ | १०० |

या सारणीमध्ये हिंदू ९३% ऊसतोडणी कामगार आढळतात. मुस्लिम १०% कामगार आढळतात. तर वनवबौद्ध ६% आढळतात. जातीमध्ये वंजारी या जातीमध्ये ३८%, मराठा३७%, धनगर५%, माळी ३%, लमाण३% लोक आढळतात.

ऊसतोडणी कामगारांच्यामध्ये सर्वात जास्त कामगार ९३% हे हिंदूधर्मीय आहेत. तर सर्वात कमी १% हे मुस्लिम धर्मीय आहेत. जातीवरुन विचार करता सर्वात जास्त ऊसतोडणी कामगार हे वंजारी आहेत.(३८% ) तर मराठा समाजातील ३७% ऊसतोडणी कामगार आढळतात. सर्वात कमी २% कामगार सणगर जातीतील आहेत.

ऊसतोडणी कामगारांच्यामध्ये कनिष्ठ जातीतील लोकांचाच भरणा आहे असे म्हणता येणार नाही. कारण अनु.जातीतील(नवबौध्दासह) ११% लोक आहेत. इतर मागासवर्गीयातील ४८% तर मराठा जातीमधील ३७% ऊसतोडणी कामगार पाहिले तर कनिष्ठ आर्थिक परिस्थितीमुळे हे कामगार हे काम करण्यास तयार झाले आहेत.असे म्हणावे लागेल. "महाराष्ट्रातील वर्ग व जाती यांचे परस्पर संबंध पाहिले की एक गोष्ट ध्यानात येईल ती म्हणजे कोणतीच जात वर्गदृष्टया आज एकसंघ राहिलेली नाही. ब्राम्हण,मराठा किंवा महार अशी कोणतीही जात घेतली तरी निरनिराळया आर्थिक गटात ती विभागली गेली आहे."[२]


## ४.८ शिक्षण :

सारणी क्रमांक ७

* शिक्षणविषयक दर्जानुसार वर्गीकरण *

| अ.क्र. | शिक्षणविषयक दर्जा | पुरुष | स्त्रिया | एकूण | एकूणाशी प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पुरुष | स्त्रिया |
| १ | अशिक्षित | ४९ | १२ | ६१ | ६२.० | ५७.२ |
| २ | प्राथमिक | २६ | ०९ | ३५ | ३२.७ | ४२.८ |
| ३ | माध्यमिक | ०३ | - | ०३ | ४.१ | 000 |
| ४ | महाविद्यालयीन | ०१ | - | ०१ | १.२ | 0 0 |
| | एकूण | ७९ | २१ | १00 | १00.0 | १00.00 |

## शिक्षण विषयक दर्जानुसार वर्गीकरण.




Major

या सारणीमध्ये शिक्षणविषयक दर्जानुसार वर्गीकरण दाखविले आहे. अशिक्षित वर्गामध्ये पुरुष ४९% तर स्त्रिया १२% असे एकूण ६१% प्रमाण आहे. एकूण ७९% पुरुषाशी अशिक्षितांचे प्रमाण ६२% आहे. तर एकूण २१% स्त्रियांशी अशिक्षित स्त्रियांचे प्रमाण ५७.२% आहे. प्राथमिक शिक्षण घेतलेल्या पुरुषांचे प्रमाण २६% तर स्त्रियांचे ९% असे एकूण ३५% आहे. एकूण ७९% पुरुषांशी प्राथमिक शिक्षण घेतलेल्या पुरुषांचे ३२.७% प्रमाण आहे. एकूण २१% स्त्रियांशी प्राथमिक शिक्षण घेतलेल्या स्त्रियांचे ४२.८% प्रमाण आहे. माध्यमिक शिक्षण घेतलेले ३% पुरुष आहेत. तर महाविद्यालयीन शिक्षण घेतलेले १% पुरुष आहेत. त्यांचे एकूण ७९% पुरुषाशी अनुक्रमे ४.१% आणि १.२% असे प्रमाण आहे. माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केलेल्यामध्ये एकही स्त्री नाही.

मुलाखती घेतलेल्या एकूण ऊसतोडणी कामगारापैकी ३०% पुरुषांना व ९% स्त्रियांना असे एकूण ३९% लोकांनाच शिक्षणाचा लाभ झाला आहे. देशातील साक्षरतेचे प्रमाण ३६% इतके आहे. तर महाराष्ट्रात साक्षरतेचे पुरुष ५८.७९% व स्त्रिया ३४.७९ % इतके आहे. [२] त्यांच्याशी ऊसतोडणी कामगारांची तुलना करता त्यांचे साक्षरता प्रमाण भारताच्या सरासरीच्या आसपास तर महाराष्ट्र राज्याच्या सरासरी प्रमाणापेक्षा खूपच कमी आहे. पुरुष आणि स्त्रिया यांची एकूणाशी तुलना करता अशिक्षित गटामध्ये स्त्रियांचे प्रमाण पुरुषांच्या ६२% पेक्षा कमी म्हणजे ५७.२% इतके आहे. जरी प्राथमिक शिक्षणामध्ये एकूण २६% पुरुष व स्त्रिया ९% असल्या तरी एकूणाशी तुलना करता स्त्रियांचे प्रमाण ४२.८% इतके आहे. तर पुरुषांचे मात्र कमी म्हणजे ३२.७% इतके आहे. माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणाचा लाभ स्त्रियांना अजिबातच मिळालेला नाही.

स्त्रियांचे प्रमाण प्राथमिक शिक्षणात पुरुषापेक्षा जास्त असणे याला

कारण अविवाहित मुलींना कामाच्या ठिकाणी न आणणेची प्रवृत्ती व त्यामुळे शाळेत जाणेची संधी मिळणे असे असावे. तर माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण अजिबात नसणे याला लहान वयात विवाह होऊन ऊसतोडणी कामासाठी जावे लागणे हे असावे. थोडक्यात ऊसतोडणी कामगारांच्यामध्ये ६१% लोक अशिक्षित तर ३५% प्राथमिक शिक्षण घेतलेले व पुढील शिक्षण घेतलेले फक्त ४% लोक असल्यामुळे त्यांच्या निरक्षरतेचा अथवा अज्ञानाचा निश्चितपणे फायदा घेतला जात असावा. तसेच ज्यांनी माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेतलेले आहे त्यांना दारिद्र्य व वशिल्याचा अभाव यामुळे नोकरी मिळणे अवघड होऊन बसले. आणि नोकरी मिळाली तरी गांवातील मोठया कुटुंबाला नोकरीतून पोसणे अशक्य असते. म्हणूनच त्यांना नोकरीतून चरितार्थ अशक्य वाटतो.[३]

## ४.९ मातृभाषा :

सारणी क्रमांक ८

* मा तृ भा षा *

| क्रमांक | मातृभाषा | शे. प्रमाण |
|---|---|---|
| १ | मराठी | ९४ |
| २ | कन्नड | ०३ |
| ३ | अन्य | ०३ |
| | एकूण .. | १०० |

या सारणीमध्ये मराठी मातृभाषा ९४% तर कन्नड भाषा मातृभाषा असणारे३% व अन्य ३% आहेत.

सर्वात जास्त प्रमाण मराठी मातृभाषा असणारेंचे आहे. (९४%) तर अन्य भाषिक लोकांचे प्रमाण एकूण ६% आहे.

येथील स्थानिक भाषा मराठी आहे. वरील ६% ऊसतोडणी कामगारांना येथील स्थानिक समाजाशी भाषेच्या अभावाने संपर्कात अडथळे येत असले तरी देखील ते लोक रोजगाराच्या उपलब्धतेमुळे या व्यवसायात आलेले आढळतात.

४.१० ऊसतोडणी व्यतिरिक्त व्यवसाय :

सारणी क्रमांक ९

* इतर व्यवसाय *

| क्रमांक | व्यवसायाचे नांव | शे. प्रमाण |
|---|---|---|
| १ | शेती | ५९ |
| २ | शेतमजूरी | ३८ |
| ३ | कारागिरी | -- |
| ४ | अन्य | ०३ |
| | एकूण .. | १०० |

वरील सारणीमध्ये ऊसतोडणी व्यतिरिक्त शेती हा व्यवसाय करणारे ५९% लोक शेतमजूरी करणारे ३८% लोक तर अन्य व्यवसाय करणारे ३% लोक दिसून येतात. कारागिरी करणा-या लोकांचे प्रमाण मात्र शून्य आहे.

ऊसतोडणी व्यतिरिक्त व्यवसाय करणा-यामध्ये शेती करणा-यांचे प्रमाण ५९% हे सर्वात जास्त आहे. तर कारागिरी करणारे लोक या व्यवसायात आढळत नाहीत. सर्वात कमी ३% लोक हे अन्य व्यवसाय करणारे (उदा. दगड फोडणे, रस्त्याच्या कामावर जाणे इ.) आहेत.


शेती व्यवसायावर आधारित शेतमजूरासह ९७% लोक आहेत. जे शेती करतात त्यांची शेती दुष्काळामुळे अनिर्वाहक्षम आहे. "अनिर्वाहक्षम शेतक-यांची स्थिती भूमीहीनांच्यापेक्षा फार वेगळी नाही.[४] ग्रामीण कारागिर ऊसतोडणी व्यवसायात आढळत नाहीत. फक्त अकुशल श्रमीकच (अनिर्वाहक्षम शेतकरी व भूमिहिन) हा व्यवसाय करताना आढळतात.

### ४.११ जिल्हावार ऊसतोडणी कामगार :

सारणी क्रमांक १०

* जिल्हावार विभागणी *

| क्रमांक | जिल्हा | शे.प्रमाण |
|---|---|---|
| १ | सातारा | ०२ |
| २ | सांगली | ०८ |
| ३ | अहमदनगर | १२ |
| ४ | बीड | ७३ |
| ५. | उस्मानाबाद | ०२ |
| ६ | सोलापूर | ०३ |
| | एकूण .. | १०० |




Major

येथे सातारा आणि उस्मानाबाद जिल्हयातील प्रत्येकी २% कामगार आहेत. सोलापूर ३% तर सांगली ८% तोडणी कामगार आहेत. नगर जिल्हयातील १२% तर बीड जिल्हयातील ७३% तोडणी कामगार आहेत.

सर्वात जास्त ऊसतोडणी कामगार हे बीड जिल्हयातील आहेत. त्यांचे प्रमाण ७३% आहे. तर सर्वात कमी २% कामगार सातारा व उस्मानाबाद जिल्हयातील आहेत.

कराड तालुक्यात काम करणा-या एकूण ऊसतोडणी कामगारांचे इतर सर्व जिल्हयापेक्षा बीड जिल्हयातून येणारांचे प्रमाण जास्त आहे. दुष्काळाचे प्रमाण तेथे अतीशय तीव्र असावे. तसेच प्रामुख्याने अष्टी, केज, जामखेड, बीड, माजलगांव, पाथर्डे या तालुक्यातीलच जास्त मजूर येथे आढळतात.[५]

४.१२ मूळ गांव व कामाचे ठिकाण :

सारणी क्रमांक ११

* अंतर *

| क्रमांक | अंतर (किलोमीटरमध्ये) | शे.प्रमाण |
|---|---|---|
| १ | १०० ते २०० | १३ |
| २ | २०० ते ३०० | १२ |
| ३ | ३०० ते ४०० | ०२ |
| ४ | ४०० चे वर | ७३ |
| | एकूण .. | १०० |

१०० ते २०० कि•मी•अंतरावरुन आलेले उसतोडणी कामगार १३% आहेत• २०० ते ३०० कि•मी•अंतरावरुन आलेले १२% कामगार आहेत• ३०० ते ४०० कि•मी•अंतरावरील २% तर ४०० कि•मी•पेक्षा जास्त अंतरावरुन आलेले ७३% उसतोडणी कामगार आहेत•

सर्वात जास्त उसतोडणी कामगार ७३% हे ४०० कि•मी• पेक्षा दुरुन आलेले आहेत•

येथे असे म्हणता येईल की, वरील भागातील दुष्काळामुळे आणि कराड तालुक्यात उपलब्ध होणा-या रोजगारामुळे व जवळच्या अंतरातील मजुरांच्या अनुपलब्धतेमुळे इतक्या दुरवरुन हे कामगार येत असावेत किंवा त्यांना येथे आणले जात असावे•

## ४•१३ कारखाना :

कराड तालुक्यातील सहयाद्री सहकारी साखर कारखाना व कृष्णा सहकारी साखर कारखाना या दोन्हींच्या कार्यक्षेत्रातील संशोधनासाठी मिळालेल्या उसतोडणी कामगारांची विभागणी पुढील प्रमाणे :

सारणी क्रमांक १२

* कारखान्यानुसार विभागणी *

| क्रमांक | कारखान्याचे नांव | निवडलेल्या कामगाराचे प्रमाण |
|---|---|---|
| १ | सहयाद्री सहकारी साखर कारखाना | ४३ |
| २• | कृष्णा सहकारी साखर कारखाना | ५७ |
| | एकूण •• | १०० |

कृष्णा सहकारी साखर कारखान्यातील ५७% ऊसतोडणी कामगार आहेत. तर सहयाद्री सहकारी साखर कारखान्याचे ४३% ऊसतोडणी कामगार आहेत.

कृष्णा सहकारी साखर कारखान्यातील ऊसतोडणी कामगार मुलाखतीसाठी जास्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले आहेत.

कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे कार्यक्षेत्र व ऊसतोडणी कामगारांची संख्या देखील सहयाद्री सहकारी साखर कारखान्यापेक्षा जास्त आहे. सहयाद्री सहकारी [redacted] कारखान्याच्या जवळ-जवळ अडीचपट ऊसतोडणी कामगार कृष्णा मध्ये आहेत.[६]

(ब) <u>टोळी अथवा गटाचे स्वरुप</u> :

४.१४ <u>गट व नातेवाईक कुटुंबे</u> :

सारणी क्रमांक १३

* <u>परस्पर नातेवाईकावरुन गटांचे प्रमाण</u> *

| अनुक्रमांक | परस्पर नातेवाईकांचे प्रमाण | गटांचे प्रमाण |
|---|---|---|
| १. | सर्वच नातेवाईक | २८ |
| २. | कांही नातेवाईक | ५० |
| ३. | नातेवाईक नाहीत | २२ |
| | एकूण .. | १०० |

वरील सारणीमध्ये सर्वच नातेवाईक असणा-या टोळ्या २८% आहेत; तर कांही नातेवाईक असणा-या टोळ्या ५०% आहेत. तर नातेवाईक नसणा-या टोळ्या २२% आहेत असे दिसते.

सर्वात जास्त प्रमाण कांही नातेवाईकांचा समावेश असणा-या टोळ्यांचे आहे. हे प्रमाण ५०% आहे. तर सर्वात कमी प्रमाण नातेवाईक नसणा-या टोळ्याचे आहे.(२२%) सर्वच नातेवाईक अथवा काही नातेवाईक अशा प्रकारच्या टोळ्याचे एकूण प्रमाण ७८% आहे.

येथे असे दिसते की, ऊसतोडणी कामगार आपल्या टोळ्यात अथवा अम गटात जास्तीत जास्त नातेवाईकासह रहाणे जास्त पसंत करतो.

## ४.१५ नातेवाईक कुटुंबे व आपसातील भांडणे यांचा संबंध :

### सारणी क्रमांक १४

### * नातेवाईक कुटुंबे व भांडणाचे प्रमाण *

| क्रमांक | कुटुंबाचा तपशील | आपसात भांडणारी | आपसात नभांडणारी | भांडणा-यांचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १. | सर्वच नातेवाईक | ०३ | २५ | ९.२% |
| २. | काही नातेवाईक | १३ | ३७ | ३९.३% |
| ३. | नातेवाईक नाहीत | १७ | ०५ | ५१.५% |
| | एकूण .. | ३३ | ६७ | १००% |

येथे सर्वच नातेवाईक असणा-या २८% गटामध्ये ३% भांडणारी व २५% आपआपसात न भांडणारी कुटुंबे आहेत. या ३% भांडणा-यांचे एकूण आपआपसात भांडणा-या ३३% गटाशी ९.२ प्रमाण आहे. काही नातेवाईक असणा-या ५0% पैकी १३% आपआपसात भांडणारी कुटुंबे आहेत. त्यांचे एकूण आपआपसात भांडणाराशी ३९.३% प्रमाण आहे. नातेवाईक नसणा-या २२% कुटुंबापैकी १७% कुटुंबे आपसात भांडतात. त्यांचे एकूण भांडणाराशी शेकडा प्रमाण ५१.५% इतके आहे. एकूण आपसात भांडणारी ३३% व न भांडणारी ६७% आहेत.

आपआपसात सर्वात कमी प्रमाणात भांडणारे ३% गट आहेत. त्यांचे आपसात भांडणाराशी शेकडा प्रमाण ९.२% इतके आहे. व ते सर्वच नातेवाईक असणा-या गटातील आहेत. आपसात सर्वात जास्त भांडणारे लोक नातेवाईक नसणा-या टोळ्यातील आहेत. त्यांचे प्रमाण १७% आहे. त्यांचे एकूण आपसात भांडणारांशी शेकडा प्रमाण ५१.५% आहे.

ज्या टोळ्यांच्यामध्ये सर्वच नातेवाईक कुटुंबे आहेत अथवा कांही नातेवाईक कुटुंबे आहेत अशा टोळ्यांच्यामध्ये नातेवाईक नसणा-या टोळ्यांच्या पेक्षा कमी प्रमाणामध्ये भांडणे होतात असे आढळून येते.

४.१६ आपआपसातील भांडणे, कारणे व प्रमाण :

सारणी क्रमांक १५

* भांडणाची कारणे व प्रमाण *

| क्रमांक | कारणे | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | मजुरीच्या वाटपावरुन | ३ | ९.१% |
| २. | मद्यपानावरुन | २0 | ६0.६% |
| ३. | स्त्रियावरुन | ३ | ९.१% |
| ४. | इतर कारणे | ७ | २१.२% |
| | एकूण .. | ३३ | १00 % |

वरील सारणीमध्ये आपसात भांडणे करणा-या ३३ गटातील भांडणाच्या कारणांची माहिती घेतली आहे. मजुरीच्या वाटपावरुन भांडणारे ३% गट आहेत. त्यांचे एकूण आपसात भांडणा-या गटाशी ९.१% प्रमाण आहे. मद्यपानावरुन आपसात भांडणारे २० गटातील लोक आहेत. एकूण आपसात भांडणा-या गटाशी त्यांचे ६०.६% प्रमाण आहे. स्त्रियांच्यावरुन आपसात भांडणा-या गटांची संख्या ३ आहे. त्यांचे एकूणाशी प्रमाण ९.१% आहे. अन्य कारणामुळे आपसात भांडणे करणा-या गटांची संख्या ७ आहे. त्यांचे एकूणाशी प्रमाण २१.२ आहे.

आपआपसात भांडण तंटा करणा-या गटामध्ये सर्वात कमी भांडणे मजुरीच्या वाटपावरुन किंवा स्त्रियांच्यामधील भांडणातून उद्भवतात. अशा कारणांनी आपसात भांडणारे गट प्रत्येकी ३ आहेत.व त्यांचे एकूण भांडणा-यांशी प्रमाण प्रत्येकी ९.१% आहे. आपसातील भांडणे सर्वात जास्त मद्यपान या कारणामुळे होताना आढळतात असे गट २० आहेत व त्यांचे एकूण भांडणा-यांशी प्रमाण ६०.६% आहे.

येथे असे म्हणता येईल की, मुळात आपसात भांडण तंटा करणा-या ऊसतोडणी कामगारांच्या गटाचे प्रमाण ३३% आहे आणि आपसातील भांडणे ही विशेषत: मद्यपानावरुन होतात. श्रमिकांच्या मद्यपानासारख्या सवयींना आवश्यक असणारा पैसा खर्च करण्याकरिता त्यांना अधिक कर्ज घेण्याची प्रेरणा मिळते.[७] या विधानाप्रमाणे हे मद्यपान करणारे कामगार इतराकडून उसने पैसे घेतात व त्यांच्या देण्याघेण्यावरुनही आपआपसात भांडणे तंटे वाढतात.

(क) <u>कौटुंबिक माहिती व उपलब्ध सुखसोई विषयी माहिती</u> :

४·१७ मूक गांवाकडील कुटुंबाचा प्रकार व सदस्य संख्या :

सारणी क्रमांक १६

* मूक गांवातील कुटुंबप्रकार व सदस्य *

| क्रमांक | सदस्य संख्या | कुटुंबाचा प्रकार | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | एकत्र % | विभक्त % | प्रमाण |
| १· | २ ते ५ | ०९ | ३८ | ४७ |
| २· | ५ ते ८ | २७ | ०५ | ३२ |
| ३· | ८ ते ११ | १८ | ०० | १८ |
| ४· | ११ च्या वर | ३ | ०० | ०३ |
| | एकूण ·· | ५७ | ४३ | १०० |

या सारणीमध्ये २ ते ५ सदस्य संख्या असणारी एकूण ४७% कुटुंबे आहेत· त्यापैकी एकत्र कुटुंब पध्दती असणारी ०९% व विभक्त कुटुंबपध्दती असणारी ३८% कुटुंबे आहेत· ५ ते ८ सदस्य असणारी २७% कुटुंबे एकत्र कुटुंब-पध्दतीतील आहेत· तर ५% कुटुंबे विभक्त कुटुंब पध्दतीतील आहेत· एकूण ३२% अशी कुटुंबे आहेत· ८ ते ११ सदस्य असणारी व ११च्या वर सदस्य असणारी कुटुंबे फक्त एकत्र कुटुंबपध्दतीमधीलच आहेत· ती अनुक्रमे १८% ते ३% आहेत· एकत्र कुटुंबपध्दतीमधील ५७% आणि विभक्त कुटुंबपध्दतीमधील ४३% कुटुंबे असे विभाजन आहे·

सर्वात जास्त प्रमाण २ ते ५ सदस्यसंख्या असलेल्या कुटुंबाचे आहे· ते ४७% आहे· त्यामध्येच विभक्त कुटुंबाचे सर्वात जास्त प्रमाण आहे· सर्वात

कमी ३% प्रमाण ११ च्या वर सदस्य असलेल्या कुटुंबाचे आहे. त्यामध्ये फक्त एकत्र पध्दतीचीच कुटुंबे आहेत. विभक्त कुटुंबे फक्त २ ते ५ सदस्य संख्या अथवा ५ ते ८ सदस्य संख्या यातच आढळतात. एकत्र कुटुंबाची सर्वात जास्त संख्या २७% ही ५ ते ८ सदस्य संख्या असलेल्या कुटुंबातच आपणाला आढळते.

सदस्य संख्येच्या प्रमाणात विभागून कुटुंबाची पहाणी केली असता विभक्त कुटुंबपध्दतीचे प्राबल्य ऊसतोडणी कामगारात वाढत आहे असे दिसते. कामाच्या ठिकाणी तर त्यांच्या कुटुंबाची स्थिती केंद्रकुटुंब (पती-पत्नी-मुले) अशीच दिसते. विभक्त कुटुंब हे औद्योगिक समाजव्यवस्थेस सुसंगत असल्याने या समाजव्यवस्थेस सुसंगत असेच लक्षण विशेष या पध्दतीत येणे अपरिहार्य आहे.[८] या मताप्रमाणे ऊसतोडणी कामगारांची कुटुंबे देखील ही लक्षणे आत्मसात करीत आहेत असे वाटते.

४.१८ कुटुंब प्रमुख :


सारणी क्रमांक १७

* कुटुंब प्रमुख म्हणून जबाबदारी *

| क्रमांक | कुटुंब प्रमुख | पुरुष % | स्त्रिया % | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | स्वत: | ३९ | १ | ४० |
| २. | आई | ०१ | -- | ०१ |
| ३. | वडील | २७ | -- | २७ |
| ४. | वडीलभाऊ | ०९ | -- | ०९ |
| ५. | अन्य | ०३ | २० | २३ |
| | एकूण .. | ७९ | २१ | १०० |

# * कुटुंब प्रमुख *

प्रमाण - १ से.मी. = ५ %




Major

या सारणीमध्ये पुरुष व स्त्री उत्तरदात्यानी दिलेल्या उत्तरांचे कुटुंबप्रमुखाची जबाबदारी या मुद्यावरुन विभाजन केलेले आहे. स्वत: कुटुंब प्रमुखाची जबाबदारी सांभाळणारे ३९% पुरुष व १% स्त्रिया आहेत. आईकडे ही जबाबदारी सांगणारे पुरुष १% आहेत. वडिलांच्याकडे ही जबाबदारी सांगणारे पुरुष २७% आहेत. वडीलभावाकडे ही जबाबदारी सांगणा-या पुरुषांची संख्या ९% आहे. अन्य व्यक्तीकडे ही जबाबदारी सांगणा-या पुरुषांची संख्या ३% आहे आणि स्त्रियांची संख्या २०% आहे. आई, वडील, वडीलभाऊ यांच्याकडे ही जबाबदारी आहे. असे सांगणा-या स्त्रियांचे प्रमाण ०% आहे.

कुटुंब प्रमुखाची जबाबदारी स्वत:कडे सांगणा-या कामगारांची संख्या पुरुष ३९% व स्त्रिया १% असे एकूण ४०% प्रमाण आहे हे प्रमाण सर्वात जास्त आहे तर १% हे सर्वात कमी प्रमाण आईकडे जबाबदारी सांगणा-यांचे आहे.

पुरुष ऊसतोडणी कामगारामध्ये कुटुंब प्रमुखांची जबाबदारी स्वत:कडे सांगणा-याचे प्रमाण ३९% आहे. तर स्त्री कामगारामध्ये फक्त १% आहे. कुटुंब संस्थेत स्त्रियांना ऊसतोडणी कामगार सुध्दा दुय्यमच स्थान देतात असे म्हणता येईल.

## ४.१९ कामाच्या ठिकाणी बरोबर असलेले कुटुंबसदस्य :

सारणी क्रमांक १८

* कुटुंबसदस्य ( वय व लिंग दर्जानुसार ) *

| क्रमांक | वयोगट | पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | १८ चे आतील | ८१ | ६६ | १४७ |
| २. | १८ ते २८ | ६४ | ७५ | १३९ |
| ३. | २९ ते ३८ | १३ | ०९ | २२ |
| ४. | ३९ ते ४८ | ०७ | ०२ | ०९ |
| ५. | ४९ ते ५८ | - | ०१ | ०१ |
| ६. | ५८ चे पुढील | - | - | - |
| | एकूण .. | १६५ | १५३ | ३१८ |

UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

वरील सारणी मध्ये उसतोडणी कामगाराव्यतिरिक्त त्यांच्या कुटुंबातील कामाच्या ठिकाणी असणा-या व्यक्तींची वयोगटानुसार विभागणी केलेली आहे. १८ वर्षाचे आतील ८१ मुले व ६६ मुली आहेत. १८ ते २८ वयोगटातील ६४ पुरुष व ७५ स्त्रिया आहेत. २९ ते ३८ वयोगटात १३ पुरुष व ९ स्त्रिया आहेत. ३९ ते ४८ वयोगटात ७ पुरुष व २ स्त्रिया आहेत. ४९ ते ५८ वयोगटात फक्त १ स्त्री आहे. ५८चे पुढील कोणीही नाही. एकूण ३१८ लोक आहेत.

वरील सारणीमध्ये सर्वात जास्त कुटुंब सदस्यांची संख्या १८ च्या आतील वयोगटात आहे. ती एकूण १४७ इतकी आहे. तर सर्वात कमी ४९ ते ५८ वयोगटात आहे ती फक्त १ आहे.

सर्व कुटुंबातील सदस्यांची एकूण संख्या ३१८ आणि संशोधनासाठी घेतलेले १00 उसतोडणी कामगार असे मिळून एकूण ४१८ लोक होतील. म्हणजे उसतोडणी कामगारांच्या अधिक कुटुंबात लहान मुलासह धरुन सरासरी($-\frac{४१८}{१00}-$) ४.१८ व्यक्ती कामाच्या ठिकाणी आहेत असे म्हणता येईल.

४.२0 कुटुंबसदस्य आणि शिक्षण :

सारणी क्रमांक १९ मध्ये वयोगट १८ पर्यंतचे ६३ पुरुष व ४९ स्त्रिया असे एकूण ११२ लोक अशिक्षित आहेत. तर याच वयोगटातील १७ पुरुष १७ स्त्रिया असे एकूण ३४ लोक प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले आहेत. तर याच वयोगटातील माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेली फक्त १ पुरुषव्यक्ती आहे. १८ ते २८ या वयोगटात ५२ व ६१ स्त्रिया असे एकूण ११३ लोक अशिक्षित आहेत. याच वयोगटात प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले १२ पुरुष व १४ स्त्रिया असे एकूण २६ लोक आहेत. या वयोगटात माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केलेले.कोणीही नाही. ना २९ ते ३८ या वयोगटात १२ पुरुष व ८ स्त्रिया असे एकूण २0 लोक

४·२० कुटुंबसदस्य आणि शिक्षण :

सारणी क्रमांक १९

* कुटुंबसदस्य आणि शिक्षण *

| क्रमांक | वयोगट | अशिक्षित | | | प्राथमिक | | | माध्यमिक | | | महाविद्यालयीन | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रि | एकूण | पुरुष | स्त्रि | एकूण | पुरुष | स्त्रि | एकूण | पुरुष | स्त्रि | एकूण | पुरुष | स्त्रि | एकूण |
| १· | १८ पर्यंत | ६३ | ४९ | ११२ | १७ | १७ | ३४ | १ | -- | १ | -- | -- | -- | ८१ | ६६ | १४७ |
| २· | १८ ते २८ | ५२ | ६१ | ११३ | १२ | १४ | २६ | -- | -- | -- | -- | -- | -- | ६४ | ७५ | १३९ |
| ३· | २९ ते ३८ | १२ | ०८ | २० | ०१ | ०१ | ०२ | -- | -- | -- | -- | -- | -- | १३ | ०९ | २२ |
| ४· | ३९ ते ४८ | ०७ | ०२ | ०९ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०७ | ०२ | ०९ |
| ५· | ४९ ते ५८ | ०० | ०१ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०० | ०१ | ०१ |
| ६· | ५८ चे पुढे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | एकूण ·· | १३४ | १२१ | २५५ | ३० | ३२ | ६२ | १ | -- | १ | -- | -- | -- | १६५ | १५३ | ३१८ |

अशिक्षित आहेत. याच वयोगटात १ पुरुष व १ स्त्रि असे एकूण २ लोक प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले आहेत. याही वयोगटात माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केलेले कोणीही नाही. ३९ ते ४८ वयोगटात ०७ पुरुष व २ स्त्रिया असे एकूण ९ लोक आहेत व ते अशिक्षित आहेत. ४९ ते ५८ मध्ये फक्त १ अशिक्षित आहे. ३९ ते ४८ व ४९ ते ५८ या दोन्ही गटात प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेतलेले कोणीही आढळत नाही.

वयोगट १८ पर्यंतचे एकूण पुरुष ८१ व स्त्रिया ६६ असे एकूण १४७ लोक सर्वात जास्त आहेत. त्यातील ११२ व्यक्ति शिक्षणापासून वंचीत राहिल्या आहेत. या वयोगटातील फक्त १ च व्यक्ति माध्यमिक शिक्षण घेउ शकली आहे. ४९ ते ५८ या वयोगटातील फक्त १ च आहे. या वयोगटात सर्वात कमी लोक आहेत.

येथे असे प्रश्न सांगता येतील की, (१) वयोगट १८ च्या आतील मुलांचे शिक्षण घेणेचे वय असताना देखील अशी ११२ मुले शिक्षणापासून वंचीत का राहिली आहेत ? (२) ज्या मुलांचे प्राथमिक अथवा माध्यमिक शिक्षण झाले आहे अशा मुलांना पुढील शिक्षण शक्य होणेसाठी साखरशाळा धर्तीवर शाळा शक्य आहे काय ? की जे अस्थिर दिशाहीन आयुष्याच ओझं पेलत जाणा-या वाडवडिलाप्रमाणे ही मुले त्याच जीवनाचा वारसा पुढे चालवितील.[९] (३) अशी मुले श्री.सुरेश शिंदेना आलेल्या एका अनुभवाप्रमाणे एकाच इयत्तेत कांही वर्षे तशीच रहाणार आहेत.[10] (४) किंवा त्यांना सतत शाळेत गैरहजर या नांवाखाली कमी केले जाणार आहे. किंवा शिक्षणखात्याकडून सक्तीने कमी करुन टाकले जाणार आहे.[११] या सर्वांवर एकच उपाय शक्यत आहे. तो म्हणजे त्यांच्यासाठी साखरशाळाची निर्मिती होय.

## ४·२१ घराची मालकी व स्वरुप :

सारणी क्रमांक २०

घर (मालकी व स्वरुप)

| अ·क्र· | बाबी | घराची मालकी % | | | घराचे स्वरुप % | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | एकूण | पक्के | कच्चे | झोपडी | एकूण |
| १· | मूळगांवी | ९८ | २ | १०० | ५४ | २८ | १८ | १०० |
| २· | कामाचे ठिकाणी | -- | १०० | १०० | -- | -- | १०० | १०० |

वरील सारणीमध्ये मूळ गांवातील निवासव्यवस्था व कामाच्या ठिकाणची निवासव्यवस्था यांची तुलना केलेली आहे· मूळ गावाकडे घराची मालकी असणा-या ऊसतोडणी कामगारांचे प्रमाण ९८% आहे· तर मालकी नसणा-या लोकांचे प्रमाण २% आहे· कामाच्या ठिकाणी मात्र मालकी नसणारे १००% लोक आहेत· मूळगांवी पक्क्या स्वरुपाचे घर असणारे ५४% ऊसतोडणी कामगार आहेत· कच्च्या स्वरुपाचे घर असणारे २८% ऊसतोडणी कामगार आहेत· तसेच मूळ गांवी ज्यांच्या घराचे स्वरुप झोपडी आहे· असे १८% लोक आहेत· कामाच्या ठिकाणी मात्र १००% लोकांच्या घराचे स्वरुप झोपडी हेच आहे·

वरील सारणीमध्ये मूळगांवी घराची मालकी असणा-यांचे प्रमाण ९८% हे सर्वात जास्त आहे· तर पक्क्या स्वरुपाची घरे असणा-यांचे प्रमाणही सर्वात जास्त म्हणजे ५४% आहे· मूळगांवी घराचे स्वरुप झोपडी असणा-यांचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे २% आहे· कामाच्या ठिकाणी मात्र १००% लोक झोपडीत रहातात व त्यावर या १००% लोकांची मालकी नाही·

मूळगांवी घराची स्वत:ची मालकी असली तरी सर्वच ऊसतोडणी कामगार हे स्वत:ची मालकी नसलेल्या आणि कारखान्याची पुरविलेल्या साहित्यातून (तट्टया, कळक इ·) बांधलेल्या झोपड्यातून अथवा खोपटातून रहातात·

४·२२ उपलब्ध सुखसोयी :

सारणी क्रमांक २१

उपलब्ध सुखसोयी ( मूळ गांवी व कामाचे ठिकाणी )

| क्रमांक | उपलब्ध सुखसोयी | सांडपाणी व्यवस्था | | पाण्याची सोय | | | संडास व्यवस्था | | स्त्रियासाठी स्नानगृहे | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | सार्व- विहिर | पाणी पुरवठा योजना | खाजगी योजना | होय | नाही | होय | नाही |
| १· | मूळ गांवी | ३१ | ६९ | ४९ | १२ | ३९ | -- | १०० | ४९ | ५१ |
| २· | कामाचेठिकाण | -- | १०० | २९ | ४२ | २९ | -- | १०० | -- | १०० |

वरील सारणीमध्ये ऊसतोडणी कामगारांना मिळणा-या सुविधांची ( मूळ गांवातील व कामाच्या ठिकाणची ) तुलना केलेली आहे· मूळगांवी सांडपाणी व्यवस्थेची सोय असणारे ३१% तर नसणारे ६९% ऊसतोडणी कामगार आहेत· मूळ गांवी पाण्याची सोय सार्वजनिक विहिरीमार्फत असणारे ४९% पाणी पुरवठा योजनेमार्फत असणारे १२% तर खाजगी विहिरीमार्फत असणारे ३९% ऊसतोडणी कामगार आहेत· मूळगांवी स्त्रियासाठी स्नान सुविधा असणारे ४९% तर नसणारे ५१% ऊसतोडणी कामगार आहेत· संडासव्यवस्था

(मूळगांवी) १००% कामगारांना नाही. कामाच्या ठिकाणी सांडपाणी, संडासव्यवस्था, स्त्रियासाठी स्नानगृहे नसणारे १००% लोक आहेत. कामाच्या ठिकाणी पाण्याची सोय सार्वजनिक विहिरीमार्फत असणारे ४९%, शेतीच्या पाणीयोजनेतून सोय उपलब्ध झालेले ४२% तर खाजगी विहिरीमार्फत सोय असणारे २९% ऊसतोडणी कामगार आहेत.

दोन्हीकडे पिण्याच्या पाण्याची सुविधा थोडया फार प्रमाणात उपलब्ध आहे. इतर सुविधा मात्र दोन्ही ठिकाणी अगदी नगण्य वाटतात.

ऊसतोडणी कामगारासाठी म्हणून वरील पैकी कोणत्याही सुखसोयीं-ची व्यवस्था शासनाने अथवा कारखान्यांनी करण्याचे टाळले आहे असे वाटते.

### ४.२३ झोपडीत उजेडाची सोय :

कारखान्याच्या जवळपास ऊसतोडणी व गाडीवान कामगारांची जी दाट वस्ती आहे. तेथे विजेचे अल्पप्रमाणात खांब उभारुन उजेडाची सोय केली आहे परंतु झोपडीत मात्र विजेचा वापर उजेडासाठी नाही. त्यासाठी पर्यायी वापर दाखविणारी सारणी पुढील प्रमाणे :

**सारणी क्रमांक २२**

* उजेडासाठी पर्यायी वापर *

| क्रमांक | पर्यायी वापर | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १. | कंदील | २१% |
| २. | गॅसबत्ती | ००% |
| ३. | अन्य (दिवा) | ७२% |
| ४. | कशाचाच वापर नाही | ०७% |
| | एकूण .. | १००% |

१००% लोकांना झोपडीत वीजवापरासाठी सुविधा नाही. सर्वात जास्त प्रमाण दिवा अथवा चिमणीचा वापर करणारांचे आहे. ते प्रमाण ७२% आहे. कंदिलाचा वापर करणारे २१%, गॅसबत्तीचा ०%, कशाचाच वापर न करणारे लोक ०७% आहेत.

कशाचाही वापर न करणा-या लोकांचे ७% प्रमाण हे सर्वात कमी तर दिवा वापरणा-यांचे ७२% प्रमाण हे सर्वात जास्त प्रमाण आहे.

साखर कारखान्यांचा परिसर विजेच्या रोषणाईने झळाळून निघाला असला तरी त्याच्या बांधावरच्या झोपडीत रॉकेलची चिमणीच ढणढणत असते. ऊसतोडणी कामगारांना झोपडीत उजेडासाठी म्हणून विजेचा वापर ही बाबच जणू हास्यास्पद ठरेल !

४.२४ भांडयाकुंडयाची उपलब्धता / :

सारणी क्रमांक २३

* भांडयाकुंडयाची उपलब्धता *

| अनुक्रमांक | उपलब्धतेचे मार्ग | प्रमाण |
|---|---|---|
| १. | गांवाकडून सर्वच भांडी आणणे | ६९ % |
| २. | कांही येथे नवीन खरेदी करणे | ३१% |
| ३. | सर्वच भांडी नवीन खरेदी करणे | ०% |
| | एकूण .. | १००% |

वरील सारणीमध्ये गावाकडून सर्वच भांडीकुंडी उपलब्ध करणा-या ऊसतोडणी कामगारांचे प्रमाण ६९% आहे. कांही नवीन भांडी येथे खरेदी करणा-यांचे प्रमाण ३१% तर सर्वच भांडी नवीन घेणारांचे प्रमाण ०% आहे.

वरील सारणीमध्ये सर्वात जास्त प्रमाण ६९% हे गांवाकडूनच सर्व भांडीकुंडी आणणारांचे आहे. तर सर्वच भांडी नवीन घेणारांचे प्रमाण शून्य आहे.

जी कांही अल्पप्रमाणामध्ये अत्यावश्यक अशी चारदोन भांडीकुंडी देखील ऊसतोडणी कामगार येथे नवीन विकत घेऊ शकत नाहीत तर ती तो मूळ गांवाकडूनच आणत असतो.

४.२५ कामासाठी निवडीचे माध्यम :

सारणी क्रमांक २४

* कामासाठी निवडीचे माध्यम *

| अनुक्रमांक | निवड करणारा | प्रमाण |
|---|---|---|
| १. | मुकादम | ८१% |
| २. | टोळीचा पुढारी | १८% |
| ३. | अन्य | ०१% |
| | एकूण .. | १००% |

कामासाठी निवड करणे म्हणजेच कंत्राटदाराने किंवा ठेकेदाराने किंवा

मुकादमाने कारखाना अधिका-यांशी करार करणे होय. असे बरेच कंत्राटदार किंवा मुकादम असतात की ज्यांच्याकडे १५ ते २० टोळ्या असतात. अशा मुकादमाकडून कामासाठी निवड झालेल्यांचे प्रमाण ८१% आहे. एखाद्या टोळीतील कामगार हाच पुढारी किंवा मुकादम असतो. त्यांच्याकडून निवड झालेल्यांचे प्रमाण १८% आहे. अन्य मार्गाने कामावर आलेल्यांचे प्रमाण १% आहे.

मुकादमाकडून कामासाठी निवड झालेल्यांचे प्रमाण हे सर्वात जास्त म्हणजे ८१% आहे. तर अन्य मार्गाने निवड होण्याचे प्रमाण हे सर्वात कमी म्हणजे १% आहे.

ऊसतोडणी कामगारांच्या सुरवातीला कामावर येण्यासाठीच्या करारापासून मुकादम अथवा कंत्राटदार यांच्या या कामातील सर्वात महत्वपूर्ण घटक म्हणून कार्य करत असतो असे वाटते.

४.२६ गटप्रमुखाकडून अथवा मुकादमाकडून देखरेख :

सारणी क्रमांक २५

* मुकादम, इतर गटप्रमुख व देखरेख कार्य *

| क्रमांक | बाब | होय | नाही | एकूण प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १. | मुकादमाकडून देखरेख | १९ | ८१ | १००% |
| २. | इतर गटप्रमुख | ८१ | १९ | १००% |

वरील सारणीमध्ये मुकादमाकडून देखरेख केली जाते असे सांगणारे १९% लोक आहेत. तर केली जात नाही असे सांगणारे ८१% आहेत. ८१% लोक गटप्रमुखाकडून देखरेख केली जाते असे सांगतात. तर १९%"नाही"असे मत व्यक्त करतात.

साहजिकच, मुकादम आणि गटप्रमुख यांच्या देखरेखीबाबत एकमेकांच्या विरोधी असे हे प्रमाण आहे.

येथे असे म्हणता येईल की जे मोठे म्हणून गणले जाणारे मुकादम आहेत की ज्यांचेकडे जास्त टोळ्या असतात. ते त्या टोळीतील एखाद्या विश्वासू व्यक्तीला गट प्रमुख बनवत असतील व ते ८१% कामगारावर देखरेखीचे कार्य करत असतील. ज्यांच्याकडे एखादीच टोळी आहे अशा मुकादमांच्या टोळीमध्ये गटप्रमुखाचा प्रश्नच येत नाही.व ते स्वत: टोळीबरोबर काम करत असल्याने १९% कामगारावर हे मुकादम स्वत: देखरेख करत असतील. त्यामुळे हे दोन्हींच्या देखरेखीबाबत परस्पर विरोधी प्रमाण आढळते.

४.२७ नातेसंबंध व श्रमविभाजन :

सारणी क्रमांक २६

* टोळीतील नातेसंबंध व कामवाटप *

| क्रमांक | कामाचे वाटप नातेसंबंध | स्त्रियांना वेगळे काम | वृध्दांना वेगळे काम | स्त्री-पुरुषांना समान काम | अन्य | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | सर्वच नातेवाईक | २१ | -- | ०२ | ५ | २८ |
| २. | कांही नातेवाईक | ४३ | -- | ०६ | १ | ५० |
| ३. | नातेवाईक नाहीत | १० | -- | ११ | १ | २२ |
| ४. | | | | | | |
| | एकूण .. | ७४ | -- | १९ | ७ | १०० |

वरील सारणीमध्ये सर्वच नातेवाईक असणा-या २८% गटातील २१% गटात स्त्रियांना वेगळे काम दिले जाते. स्त्री-पुरुषांना समान काम ०२% गटात दिले जाते. तर कामवाटप अन्य प्रकारे (वेळयेईल त्यानुसार) ०५% गटात केले जाते. कांही नातेवाईक असणा-या ५०% गटापैकी ४३% गटात स्त्रियांना वेगळे काम दिले जाते. तर स्त्री-पुरुषांना समान काम ६% गटात दिले जाते. व अन्य प्रकारे १% श्रमविभाजन केले जाते. नातेवाईक नसणा-या २२% गटामध्ये स्त्रियांना वेगळे काम देणारे १०% गट आहेत तर समान काम वाटप करणारे ११% गट आहेत. आणि अन्य प्रकारे श्रमविभाजन करणारे १% गट आहेत. वृध्द लोक ऊसतोडणी कामगार म्हणून कामच करत नसल्याने त्यांना वेगळे काम देणेचा प्रश्न येत नाही.

एकंदरीत स्त्रियांना वेगळे काम देणा-या गटांचे प्रमाण नातेवाईकां-वरुन पाडलेल्या सर्वच प्रकारात जास्त आहे. ते एकूण ७४% आहे. पुरुषांना समान काम देण्याची प्रवृत्ती कमी म्हणजे १९% गटातच आढळते.

ऊसतोडणी कामगार हे पुरुष अशी कामाची विभागणी करुन हलक्या स्वरुपाची कामे स्त्रियाकडे देतात.( उदा.मोळी बांधणे, वाढे वहाणे इ. ) त्यातल्या त्यात नातेवाईक असणा-या गटामधून जास्त प्रमाणात श्रमविभाजन केले जाते. व स्त्रियांना झेपतील अशीच कामे दिली जातात. वेळप्रसंगी महिला तोडलेले वाढे नजिकच्या गांवात फिरुन विकण्याचे काम करतात.

४.२८ <u>कामावर असताना संकट आल्यास कारखान्याकडून मदत व कामगार अधिकारी</u> :

सारणी क्र.२७

* कारखान्याकडून अडचणीची मदत व कामगार अधिकारी *

| अ.क्रमांक | बाब | प्रमाण % | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | माहित नाही | |
| १. | कामावर मृत्यू आलेस | -- | १ | ९९ | १०० |
| २. | कामावर जखमी झालेस | -- | ३४ | ६६ | १०० |
| ३. | इतर संकट आल्यास | -- | ४१ | ५९ | १०० |
| ४. | कामगार अधिकारी आहे काय? | -- | ६१ | ३९ | १०० |

वरील सारणीमध्ये कामगारावर वेगवेगळ्या प्रकारची संकटे आल्यास कारखान्याकडून कितपत मदत होते याची माहिती घेण्यात आली. कामावर असताना मृत्यू आल्यास मदत मिळत नाही. म्हणणा-यांचे प्रमाण १% आहे. तर माहित नाही म्हणणारे ९९% लोक आढळले. कामावर असताना जखमी झाल्यास मदत मिळत नाही म्हणणा-यांचे प्रमाण ३४% आहे. तर माहित नाही. म्हणणा-यांचे प्रमाण ६६% आहे; इतर संकटे आल्यास मदत मिळत नाही म्हणणा--यांचे प्रमाण ४१% तर माहित नाही. म्हणणा-यांचे प्रमाण ५९% आहे. वरील कोणत्याही प्रसंगी कारखान्याकडून मदत मिळते म्हणणारे किंवा होय म्हणणारे लोक 0% आहेत. कामगार अधिकारी आहेत काय ? या प्रश्नाला नाही असे उत्तर देणारे ६१% लोक आहेत. तर माहित नाही म्हणणारे ३९% लोक आहेत. होय म्हणून उत्तर देणारांचे प्रमाण 0% आहे.

वरील सारणीमध्ये कोणत्याही बाबीविषयी होय म्हणून उत्तर

देणा-यांचे प्रमाण सर्वात कमी आहे. माहित नाही असे उत्तर देणा-यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

वरील सारणीमध्ये माहित नाही असे उत्तर देणा-यांचे प्रमाण बरेच जास्त आहे. यावरुन ऊसतोडणी कामगार स्वत:च्या सुरक्षेबाबत किती अनभिज्ञ आहे याची जाणीव होते. तर होय म्हणून उत्तर देणा-याचे प्रमाण शून्य % आहे, यावरुन कारखाने त्यांच्या सुरक्षेसंबंधी काळजी घेतात की नाही याबद्दलच शंका उत्पन्न होते. कामगार अधिका-यांच्या बाबतीत दोन्ही कारखान्यातील एकही व्यक्ति कामगार अधिकारी आहेत असे सांगणारी आढळली नाही. त्यामुळे कामगार अधिका-यांच्या प्रस्तुत संबंधातील कामाबाबत शंका निर्माण होते.

४.२९ संघटनेशी परिचय :

सारणी क्रमांक २८

* संघटना परिचयाचे मार्ग *

| क्रमांक | संघटना परिचय मार्ग | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १. | नेत्यांच्या माध्यमातून | ६४% |
| २. | प्रश्न समजून घेऊन संघटना आमच्याकडे आली | १५% |
| ३. | अन्य | २१% |
| ४. | संघटना परिचय नाही. | ०% |
| | एकूण .. | १००% |

वरील सारणीमध्ये संघटनेशी नेत्यांच्या माध्यमातून परिचय झालेल्या लोकांचे प्रमाण ६४% आढळून येते. तर आमचे प्रश्न समजून घेऊन संघटना आमच्याकडे

आली असे म्हणणा-यांचे प्रमाण १५% आहे. अन्य माध्यमातून संघटनेशी परिचय झाला. असे सांगणा-यांचे प्रमाण २१% आहे. संघटनेशी परिचय नसणारे शून्य % लोक आहेत.

संघटनेशी नेत्यांच्या माध्यमातून परिचय झालेल्यांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ६४% आहे. तर आमचे प्रश्न जाणून घेऊन संघटना आमच्याकडे आली असे म्हणणा-यांचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे १५% आहे.

कराड तालुक्यातील ऊसतोडणी कामगारामध्ये संघटनात्मक ऐक्य निर्माण करुन आपल्या हक्कांची जाणीव निर्माण करण्याचे कार्य संघटना नेत्यांनी चांगले केले आहे.असे म्हणावे लागेल.


(ड) ऊसतोडणी कामगार आर्थिक बाजू :

४.३० शिल्लक रक्कमेच्या सुरक्षिततेचे उपाय :

सारणी क्र.२९

* शिल्लक रक्कमेच्या सुरक्षितता *

| क्रमांक | बाब | प्रमाण |
|---|---|---|
| १. | बॅन्केमध्ये | ०२ |
| २. | स्वत: जवळ | ०६ |
| ३. | मूळगांवाकडे | १४ |
| ४. | मुकादम | ५७ |
| ५. | इतर | २१ |
| | एकूण .. | १००% |


प्रमाण
१ सें.मी. = १०%
इतर
मुकादम
स्वतः जवळ
बँकमध्ये

वरील सारणीमध्ये रक्कम बॅन्केत शिल्लक ठेवणारे २% तर स्वत:जवळ ठेवणारे ६% आणि मूळ गांवाकडे शिल्लक पाठविणारे १४% व इतरत्र ठेवणारे २१% ऊसतोडणी कामगार आहेत. मात्र मुकादमाजवळ शिल्लक रक्कम ठेवणारे ५७% ऊसतोडणी कामगार आहेत.

येथे बॅन्केमध्ये शिल्लक ठेवणारांचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे २% आहे. तर मुकादमाजवळ शिल्लक रक्कम ठेवणारांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ५७%आहे.

सर्वच ऊसतोडणी कामगार हे ग्रामीण भागातून आलेले आहेत. परंतु अजूनही हे ऊसतोडणी कामगार ज्या दुष्काळी भागातून येतात त्या भागातील बॅन्कींगच्या परिस्थितीमुळे त्यांच्यामध्ये बॅन्कींगच्या सवयींचा अभाव दिसतो. त्यामुळे ते आपली शिल्लक बॅन्केत ठेवत नसावेत.

## ४.३१ मुकादमावरील विश्वास व शिक्षण :

सारणी क्रमांक ३०

* मुकादमावरील विश्वास व शिक्षण *

| क्रमांक | शैक्षणिक दर्जा | मुकादमावर विश्वास | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | |
| १. | अशिक्षित | ६१ | ०० | ६१ |
| २. | प्राथमिक शिक्षण | २४ | ११ | ३५ |
| ३. | माध्यमिक शिक्षण | ०१ | ०२ | ३ |
| ४. | महाविद्यालयीन | ०० | ०१ | १ |
| | एकूण .. | ८६ | १४ | १०० |

या सारणीमध्ये अशिखित असणा-या ६१ उसतोडणी कामगारांचा मुकादमावर विश्वास आहे. एकूण अशिक्षित कामगारांशी हे प्रमाण १००% आहे. प्राथमिक शिक्षण घेतलेल्या ३५ पैकी २४ लोकांचा मुकादमावर विश्वास आहे. तर ११ लोकांचा मुकादमावर विश्वास नाही. मुकादमावर विश्वास ठेवणा-या उसतोडणी कामगारांचे एकूण प्राथमिक शिक्षण घेतलेल्या उसतोडणी कामगाराशी ६८.७% प्रमाण आहे. माध्यमिक शिक्षण घेतलेल्या ३ पैकी एका कामगाराचा मुकादमावर मुकादमावर विश्वास आहे. तर २ कामगारांचा मुकादमावर विश्वास नाही. महाविद्यालयीन शिक्षण घेतलेला १ उसतोडणी कामगार आहे व त्याचा मुकादमावर विश्वास नाही. हे प्रमाण १००% पडते.

मुकादमावर विश्वास ठेवणा-या उसतोडणी कामगारांचे सर्वात जास्त प्रमाण १००% हे अशिक्षित उसतोडणी कामगारात आहे. तर विश्वासाचे सर्वात कमी म्हणजे ०% प्रमाण हे महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या उसतोडणी कामगारामध्ये आहे.

शिक्षणाच्या प्रभावामुळे उसतोडणी कामगारामध्ये मुकादम आपली पिळवणूक करत आहे, याबाबत हळूहळू विचार परिवर्तन होत आहे.

४.३२ उत्पन्नाच्या बाबी व मिळणारे उत्पन्न (कामाच्या ठिकाणी) :

सारणी क्रमांक ३१

कामाच्या ठिकाणाच्या उत्पन्नाच्या बाबी व उत्पन्न(वार्षिक)

सारणी क्रमांक ३१

कामाच्या ठिकाणाच्या उत्पन्नाच्या बाबी व उत्पन्न(वार्षिक)

| क्रमांक | उत्पन्नाच्या बाबी उत्पन्न मर्यादा | ऊस-तोडणी | ऊस-तोडणी व वाढे विक्री | ऊस-तोडणी वाढे विक्री पशुपालन | ऊसतोडणी वाढे विक्री पशुपालन, कुकुटपालन | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | १000 पर्यंत | -- | -- | -- | -- | -- |
| २. | २00१ ते ३ हजारापर्यंत | -- | ३७ | -- | -- | ३७ |
| ३. | ३00१ते ४हजारापर्यंत | -- | २१ | -- | -- | २१ |
| ४. | ४00१ते ५हजारापर्यंत | -- | -- | ४२ | -- | ४२ |
| ५. | ५000 च्या पुढे | -- | -- | -- | -- | -- |
| | एकूण .. | -- | ५८ | ४२ | -- | १00 |

या सारणीमध्ये फक्त ऊसतोडणी करुन त्यापासून उत्पन्न मिळविणारांचे प्रमाण शून्य आहे. ऊसतोडणी व वाढेविक्री करणारे व ज्यांचे उत्पन्न २00१ ते ३000 पर्यंत आहे असे ३७% ऊसतोडणी कामगार आढळतात. यामध्येच ३00१ ते ४000 पर्यंत उत्पन्न असणारे २१% ऊस तोडणी कामगार आढळतात. ४00१ ते ५000 पर्यंत उत्पन्न असणारे ४२% ऊसतोडणी कामगार ऊसतोडणी, वाढेविक्री व पशुपालन करणारे आहेत. कुक्कुटपालन करणारे ऊसतोडणी कामगार आढळत नाहीत.

ऊसतोडणी कामगारांच्या उत्पन्नाची कमीतकमी मर्यादा २00१ रुपयापासून जास्तीत जास्त ५000 रु. पर्यंत आहे.

उसतोडणी कामगारानी एवढे कष्ट घेऊन देखील त्यांची उत्पन्न मर्यादा २००१ ते ५००० च्या दरम्यान आहे. या उत्पन्नाचे मध्यमान ३५०० रु. मानले व एकंदरीत कामाचे दिवस १८० मानले तर दरदिवशी सरासरी त्याचे उत्पन्न १९.४१ होईल. हे उत्पन्न त्याच्या कुटुंबाचा खर्च भागविण्यास अत्यंत अपुरे आहे. तसेच हे उत्पन्न एका कोयत्याचे म्हणजेच दोन व्यक्तीचे आहे.

४.३३ कर्ज मिळविण्याचे मार्ग :

सारणी क्रमांक ३२

* कर्ज मिळविण्याची साधने व प्रमाण *

| क्रमांक | साधन | प्रमाण | एकूण |
|---|---|---|---|
| १. | सावकार | २१ | २१ |
| २. | बॅंन्क | ०७ | ०७ |
| ३. | सहकारी सोसायटी | १४ | १४ |
| ४. | मित्र व नातेवाईक | ०९ | ०९ |
| ५. | मुकादम | १०० | १०० |
| ६. | अन्य | ०९ | ०९ |

वरील सारणीमध्ये सावकाराकडून कर्ज उपलब्ध झालेले उसतोडणी कामगार २१ % आहेत. तर बॅंन्केतून कर्ज घेतलेले उसतोडणी कामगार ०७% आहेत. सहकारी सोसायटीकडून कर्ज उपलब्ध करुन घेतलेले १४% उसतोडणी कामगार आहेत. मित्र व नातेवाईकांकडून कर्ज घेणारे ०९% कामगार आहेत.

मुकादमाकडून कर्ज घेणारे १००% लोक आहेत. अन्य मार्गाने कर्ज घेणारे कामगार ०९% आहेत. ऊसतोडणी कामगारामध्ये बँन्केकडून कर्ज उपलब्ध झालेल्या ऊसतोडणी कामगारांचे प्रमाण ०७% आहे आणि हे प्रमाण सर्वात कमी आहे. मुकादमाकडून कर्ज घेणाराचे प्रमाण १०० % आहे. आणि ते प्रमाण सर्वात जास्त आहे. कांही कामगार एकापेक्षां अधिक ठिकाणाहून कर्ज घेतात असे दिसते.

ऊसतोडणी कामगारांचे मुकादमाकडून कर्ज घेण्याचे सर्वात जास्त प्रमाण आहे. मुकादम हा सावकराराप्रमाणेच त्यांना अर्थ सहाय्य करुन आपल्या अंकीत करुन ठेवत असतो. सावकारीला आळा घालण्याच्या दृष्टीने रिझर्व्ह बँन्क ऑफ इंडियाने बरेच प्रयत्न केले आहेत. पण ते प्रयत्न अपुरेच ठरतात. मुकादमासारखे लोक बेकायदेशीररित्या एक प्रकारची सावकारकीच करुन ऊसतोडणी कामगारांना विकत घेतल्याप्रमाणे वागतात.

४.३४ कर्जाची मर्यादा :

सारणी क्रमांक ३३

* कर्ज रक्कम *

| क्रमांक | कर्ज रक्कम | प्रमाण |
|---|---|---|
| १. | ५०० रुपये पर्यंत | १७ |
| २. | ५०० रु. ते १,००० रु. | ६८ |
| ३. | रु.१००० ते १५०० रु. | ०९ |
| ४. | रु.१५०० ते २००० रु. | ०६ |
| ५. | रु.२००० च्या वर | -- |
| | एकूण .. | १०० |

५00 रु•पर्यंत कर्ज असलेले १७% ऊसतोडणी कामगार आहेत• ५00 ते १000 रु•पर्यंत कर्ज असणारे ६८% ऊसतोडणी कामगार आहेत• १000 ते१५00 रु• पर्यंत कर्ज असणारे 0९% ऊसतोडणी कामगार आहेत• १५00 ते २000 रु•पर्यंत कर्ज असणारे 0६% ऊसतोडणी कामगार आहेत• २000 रु•च्यावर कर्ज असणारे लोक नाहीत•

५00 ते १000 रु•पर्यंत कर्ज असणा-या लोकांचे प्रमाण सर्वात जास्त (६८%) आहे• तर सर्वात कमी प्रमाण 0६% हे १५00 ते २000 रु• कर्ज असणा-या ऊसतोडणी कामगारांचे आहे•

ऊसतोडणी कामगारांच्याकडे ५000 ते १0000 रुपये पर्यंतचे कर्जाचे प्रमाण हे सर्वात जास्त आहे• म्हणजे अवघ्या ५00 ते १000 रु•च्या कर्जमर्यादेत ऊसतोडणी कामगार अडकून राहिलेला आहे•

४•३५ कर्ज काढण्याची कारणे :

सारणी क्रमांक ३४

* कर्ज काढण्याची कारणे *

| क्रमांक | कारणे | प्रमाण |
|---|---|---|
| १• | लग्न | ३४ |
| २• | शिक्षण | 00 |
| ३• | जुनी कर्जफेड | ३७ |
| ४• | घरबांधणी | 0४ |
| ५• | अन्य | २५ |
| | एकूण •• | १00 |

लग्नासाठी कर्ज घेतलेल्या ऊसतोडणी कामगारांचे प्रमाण ३४% आहे. जुन्या कर्जफेडीसाठी ३७% ऊसतोडणी कामगारांनी कर्ज घेतले आहे. घरबांधणीसाठी कर्ज घेणा-यांचे प्रमाण ०४% आहे. अन्य कारणासाठी कर्ज घेणा-यांचे प्रमाण २५% आहे. मात्र शिक्षणासाठी कर्ज घेणारी एकही व्यक्ति नाही.

जुन्या कर्ज फेडीसाठी ३७% ऊसतोडणी कामगारांनी कर्ज घेतले आहे. हे प्रमाण सर्वात जास्त आहे. तर घरबांधणीसाठी ०४% ऊसतोडणी कामगारांनी कर्ज घेतले आहे. शिक्षणासाठी कर्ज घेणारे ऊसतोडणी कामगार अजिबात नाहीत.

ऊसतोडणी कामगारामध्ये कर्जबाजारीपणाचे प्रमाण १००% आहे असे दिसते.

## ४.३६ वयोगट व कर्ज काढणेची कारणे यांची तुलना :

सारणी क्रमांक ३५

* कर्जाची कारणे व वयोगट *

| क्रमांक | वयोगट / कारण | १८ते२८ | २९ते३८ | ३९ते४८ | ४९ते५८ | ५८चेपुढे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | लग्न | २५ | ९ | -- | -- | -- | ३४ |
| २. | शिक्षण | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ३. | जुनी कर्ज फेड | ०८ | २० | ०९ | -- | -- | ३७ |
| ४. | घरबांधणी | -- | -- | ०४ | -- | -- | ०४ |
| ५. | अन्य | ०५ | १० | ०८ | ०२ | -- | २५ |
| | एकूण .. | ३८ | ३९ | २१ | ०२ | -- | १०० |

१८ ते २८ वयोगटात लग्नासाठी कर्ज घेणारांचे प्रमाण २५%, जुने कर्ज फेडीसाठी कर्ज घेणारे ०८% व अन्य कारणासाठी कर्ज घेणा-यांचे प्रमाण ०५% आहे. २९ ते ३८ वयोगटात लग्नासाठी कर्ज घेणा-यांचे प्रमाण ९% आहे. जुन्या कर्ज फेडीसाठी कर्ज घेणा-यांचे प्रमाण २०% तर अन्य कारणासाठी कर्ज घेणा-यांचे प्रमाण १०% आहे. ३९ ते ४८ वयोगटामध्ये जुने कर्ज फेड करण्यासाठी ०९% कर्ज घेणारे ऊसतोडणी कामगार आहेत. घरबांधणीसाठी कर्ज घेणा-यांचे प्रमाण ०४% आहे व अन्य कारणासाठी कर्ज घेणा-यांचे प्रमाण ०८% आहे. ४९ ते ५८ वयोगटात अन्य कारणासाठी कर्ज घेणा-यांचे प्रमाण ०२% आहे.

१८ ते २८ वयोगटात लग्नासाठी कर्ज घेणारांचे सर्वात जास्त प्रमाण आहे. (२५%) तर या वयोगटात सर्वात कमी प्रमाण अन्य कारणासाठी कर्ज घेणारांचे आहे. (०५%) २९ ते ३८ वयोगटात जुने कर्ज फेडीसाठी कर्ज घेणारांचे प्रमाण २०% आहे हे सर्वात जास्त आहे. तर लग्नासाठी कर्ज घेणारांचे प्रमाण ०९% हे सर्वात कमी आहे. ३९ ते ४८ वयोगटात जुने कर्ज फेडीसाठी कर्ज घेणारांचे प्रमाण ९% हे सर्वात जास्त आहे. तर घरबांधणीसाठी कर्ज घेणारांचे ४% प्रमाण सर्वात कमी आहे. ४९ ते ५८ वयोगटातील २ व्यक्तींनी अन्य कारणासाठी कर्ज घेतले आहे.

ऊसतोडणी कामगारामध्ये लग्न व जुने कर्ज फेडीसाठी घेतलेल्या कर्जाचे प्रमाण जास्त आहे. ते अनुक्रमे ३४%, ३७% आहे. १८ ते २८ वयोगटातील ०८% तर २९ ते ३८ वयोगटातील २०% ३९ ते ४८ वयोगटातील ०९% लोकांनी जुने कर्ज-फेडीसाठी नवीन कर्ज घेतले आहे. त्यांनी घेतलेले अशा प्रकारचे कर्ज अनुत्पादक कामासाठीच वापरले आहे असे दिसते.

(इ) ऊसतोडणी कामगार व वैद्यकिय सुविधा :

४·३७ वैद्यकिय सुविधांची उपलब्धता :

सारणी क्रमांक ३६

* वैद्यकिय सुविधा *

| क्रमांक | बाब | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १· | सरकारी अथवा खाजगी दवाखाना | ३२ | ६८ | १०० |
| २· | कारखान्यामार्फत औषधोपचार | १८ | ८२ | १०० |
| ३· | आरोग्य निरिक्षक सोय | ०० | १०० | १०० |
| ४· | रोगनिदान शिबीराचा लाभ | ०२ | ९८ | १०० |

या सारणीमध्ये सरकारी अथवा खाजगी दवाखान्याची उपलब्धता असलेले ३२% लोक आहेत· कारखान्यामार्फत औषधोपचार उपलब्ध असलेले १८% लोक आहेत· रोगनिदान शिबिराचा लाभ घेणारे २% लोक आहेत· आरोग्य निरिक्षकाची सोय कोणालाही नाही·

सर्वात जास्त प्रमाण सरकारी अथवा खाजगी दवाखान्याची सोय उपलब्ध असलेल्या ऊसतोडणी कामगारांचे आहे· तर सर्वात कमी म्हणजे २% प्रमाण रोगनिदान शिबीरांचा लाभ घेणा-या ऊसतोडणी कामगारांचे आहे·

येथे असे म्हणता येईल की, जवळ-जवळ ७०% ऊसतोडणी कामगार उपरोक्त वैद्यकिय सुविधापासून दूर लोटले गेलेले किंवा वंचित झालेले आहेत·

## ४·३८ शिक्षण व आरोग्याचे महत्व :

सारणी क्रमांक ३७

* शिक्षण व आरोग्य यांचे महत्व *

| अनुक्रमांक | आरोग्यविषयक बाबी | लहान मुलांना लस टोचणी | | | गरोदर स्त्रिया काळजी | | | रोग प्रतिबंधक लस टोचणी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शिक्षण | होय | नाही | एकूण | होय | नाही | एकूण | होय | नाही | एकूण |
| १· | अशिक्षित | ४ | ५७ | ६१ | २ | ५९ | ६१ | १४ | ४७ | ६१ |
| २· | प्राथमिक | ९ | २६ | ३५ | १० | २५ | ३५ | १३ | २२ | ३५ |
| ३· | माध्यमिक | ३ | ० | ३ | ३ | ० | ०३ | ३ | ० | ३ |
| ४· | महाविद्यालयीन | १ | ० | १ | १ | ० | ०१ | १ | ० | १ |
| | एकूण ·· | १७ | ८३ | १०० | १६ | ८४ | १०० | ३१ | ६९ | १०० |

वरील सारणीमध्ये अशिक्षित ऊसतोडणी कामगारामधील ४% लोकांना लहान मुलांना लसटोचणी, २% लोकांना गरोदर स्त्रियांची घ्यावयाची काळजी व १४% लोकांना रोगप्रतिबंधक लसटोचणी या आरोग्यविषयक बाबी महत्वाच्या वाटतात· प्राथमिक शिक्षण घेतलेल्या ९% लोकांना लहान मुलांची लसटोचणी, १०% लोकांना गरोदर स्त्रियांच्या विषयी घ्यावयाची काळजी, १३% लोकांना रोगप्रतीबंधक लसटोचणी याबाबी महत्वाच्या वाटतात· माध्यमिक व उच्च-माध्यमिक शिक्षण घेतलेल्या सर्वच ऊसतोडणी कामगारांना वरील तिन्ही आरोग्य-विषयक बाबी महत्वाच्या वाटतात·

अशिक्षित ऊसतोडणी कामगारांना वरील तिन्ही आरोग्यविषयक

बाबीसंबंधी वाटणारे महत्व कमी जाणवते· तर माध्यमिक व महाविद्यालयीन लोकांना या बाबीविषयी जास्त महत्व वाटते· तसेच एकूण प्रमाणामध्ये रोगप्रतीबंधक लसटोचणी या बाबीविषयी महत्व वाटणा-या लोकांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ३१% आहे· तर सर्वात कमी १६% प्रमाण हे गरोदर स्त्रियांची घ्यावयाची काळजी या बाबीविषयी वाटते·

अशिक्षित ऊसतोडणी कामगारांना आरोग्यविषयक बाबींच्या विषयी जास्त महत्व वाटत नाही· तर माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण घेतलेल्या ऊसतोडणी कामगारांच्या मध्ये आरोग्यविषयक बाबीविषयी आस्था आहे· तसेच स्त्रियांच्या गरोदरपणातील काळजी याबाबतीत स्त्रियांकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्तीही ऊसतोडणी कामगारात आढळते·

४·३९ दुर्धर प्रसंगातून बचाव :

सारणी क्रमांक ३८

* दुर्धर प्रसंगातून बचाव *

| क्रमांक | दुर्धर प्रसंग | बचाव झाला काय? नसेल तर कारणे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | | | |
| | | | अत्यावस्थ म्हणून | योग्य निदन अभाव | अन्य | एकूण |
| १· | सर्पदंश | ०४ | -- | -- | -- | ०४ |
| २· | मोठी जखम | ३४ | -- | -- | -- | ३४ |
| ३· | हार्ट अॅटॅक | -- | -- | -- | -- | -- |
| ४· | धनुर्वात | -- | -- | -- | -- | -- |
| ५· | अन्य | ०१ | ०१ | -- | -- | २ |
| | एकूण·· | ३९ | ०१ | -- | -- | ४० |

वरील सारणीमध्ये सर्पदंश हा दुर्धर प्रसंग आलेले ०४ ऊसतोडणी कामगार आढळले, मोठी जखम हा दुर्धर प्रसंग आलेले ३४ लोक आढळले. अन्य दुर्धर प्रसंग उद्भवलेले २ लोक आढळले. त्यापैकी १ अत्यावस्थ स्थितिमुळे बचावला नाही. हार्टअॅटॅक व धनुर्वाताचा प्रसंग कोणावरही आलेला नाही. एकूण ४० लोकांच्यावर दुर्धर प्रसंग ओढवले. त्यापैकी ३९ लोक बचावले.

मोठी जखम हा दुर्धर प्रसंग आलेल्या ऊसतोडणी कामगारांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. तर अन्य प्रसंग उद्भवलेल्यांचे प्रमाण सर्वात कमी आहे.

ऊसतोडणी कामगारांना कोयत्यासारख्या हत्याराने सतत काम करावे लागत असल्याने अनावधानाने मोठी जखम होणे असे दुर्धर प्रसंग वारंवार येतात.

## ४.४० कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया :

सारणी क्रमांक ३९

* कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया (कारणमीमांसा) *

| क्रमांक | कारणे | कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करुन घेतलेले | शस्त्रक्रिया न झालेले | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | मुले जास्त | ०९ | -- | ०९ |
| २. | अपुरे उत्पन्न | ०६ | -- | ०६ |
| ३. | प्रवर्तकाकडून फसवणूक | १५ | -- | १५ |
| ४. | अविवाहित | -- | १२ | १२ |
| ५. | नवविवाहित | -- | ४२ | ४२ |
| ६. | मुलगा नाही म्हणून | -- | ०४ | ०४ |
| ७. | भीतीमुळे | -- | ०६ | ०६ |
| ८. | धार्मिक भावना म्हणून | -- | ०१ | ०१ |
| ९. | अन्य | ०२ | ०३ | ०५ |
| | एकूण .. | ३२ | ६८ | १०० |

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

या सारणीमध्ये कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करुन घेतलेल्या आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया न झालेल्या ऊसतोडणी कामगारांच्या कारणांचा अभ्यास करण्यात आला आहे. शस्त्रक्रिया करुन घेतलेल्या पैकी ९ % कामगारांनी मुले जास्त म्हणून, ०६%कामगारांनी अपुरे उत्पन्न म्हणून, १५%कामगारांनी प्रवर्तकाच्या फसवणुकीमुळे, २% लोकांनी अन्य कारणामुळे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करुन घेतली आहे. शस्त्रक्रिया न झालेल्यापैकी १२% लोकांनी अविवाहित म्हणून, ४२% लोकांनी नवविवाहित म्हणून, ०४% लोकांनी मुलगा नाही म्हणून, ०१% लोकांनी धार्मिक भावना म्हणून, ०३% लोकांनी अन्य कारणामुळे शस्त्रक्रिया करुन घेतलेली नाही.

शस्त्रक्रिया झालेल्यामध्ये प्रवर्तकाकडून फसवणूक झालेल्यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. तर अन्य कारणामुळे शस्त्रक्रिया करवून घेणारांचे प्रमाण(०२%) हे सर्वात कमी आहे. शस्त्रक्रिया न झालेल्यामध्ये नवविवाहितांचे प्रमाण सर्वात जास्त असून ते ४२% आहे. धार्मिक भावना म्हणून शस्त्रक्रिया न करणारांचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे १% आहे.

ऊसतोडणी कामगारामध्ये शस्त्रक्रिया करुन घेणारे व त्यांच्या कारणांचा मागोवा घेतला तर ऊसतोडणी कामगारांच्या विचारामध्ये परिवर्तन करण्याऐवजी त्यांच्यावर कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेबाबत सक्ती अथवा फसवणूक झाली आहे असे वाटते. कुटुंबनियोजन कार्यक्रमाचा मूळ उद्देश त्यामुळे बाजूला पडत आहे.

(ई) इतर सामाजिक बाबी :

४.४१ जातीभेद व शिक्षण :

सारणी क्रमांक ४०

* जातीभेदविषयक बाबी व शिक्षण *

| क्रमांक | शिक्षण | जातीभेदाविषयक बाबी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | आंतरजातीय विवाह | एकत्र जेवण | सार्वजनिक ठिकाणी एकत्र येणे | सर्वच अमान्य |
| १. | अशिक्षित | - | ०४ | ४१ | २० |
| २. | प्राथमिक | - | ०९ | ३४ | १ |
| ३. | माध्यमिक | - | ०३ | ०३ | ० |
| ४. | महाविद्यालयीन | -- | ०१ | ०१ | ० |
| | एकूण .. | - | १७ | ७९ | २१ |

या सारणीमध्ये अशिक्षित कामगारापैकी ४% करमगाराना एकत्र जेवण मान्य आहे. ४१% कामगाराना सार्वजनिक ठिकाणी एकत्र येणे मान्य आहे. तर २०% कामगारांना तिन्ही बाबी अमान्य आहेत. प्राथमिक शिक्षण घेतलेल्या ९% कामगाराना एकत्र जेवण मान्य आहे. ३४% कामगाराना सार्वजनिक ठिकाणी एकत्र येणे मान्य आहे. तरी १% कामगाराना कोणतीच बाब मान्य नाही. माध्यमिक शिक्षण घेतलेल्या ३% कामगारांना एकत्र जेवण व सार्वजनिक ठिकाणी एकत्र येणे मान्य आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या १% लोकांना एकत्र जेवण व सार्वजनिक ठिकाणी एकत्र येणे या गोष्टी मान्य आहेत. आंतरजातीय विवाह ही गोष्ट मात्र कोणालाच मान्य नाही.

सर्वच बाबी अमान्य असणा-या ऊसतोडणी कामगारांचे सर्वात जास्त प्रमाण २०% हे अशिक्षित लोकात जास्त आहे. तर माध्यमिक व महाविद्यालयीन

शिक्षण घेतलेल्या ऊसतोडणी कामगारामध्ये जातिभेदविषयक सर्वच बाबी अमान्य असणारा एकही ऊसतोडणी कामगार नाही.

ऊसतोडणी कामगारांचा आर्थिक दर्जा कितीही कमी असला व ते अतिशय कष्टाची कामे करीत असले तरी जाती व्यवस्थेच्या बंधनाबाबत त्यांच्यात रोटी-बेटी व्यवहाराइतपत सुधारणा होऊ शकेलेली नाही. तसेच शैक्षणिक दर्जातील बदलानुसार जाती व्यवस्थेची बंधने सैलसर होत गेल्याची दिसून येतात.

## ४.४२ धर्म आणि जादूचे आस्तित्व व शिक्षण :

### सारणी क्रमांक ४१

### * धर्म आणि जादूचे आस्तित्व व शिक्षण *

| क्रमांक | बाब<br>शिक्षण | परमेश्वराचे आस्तित्व मानणारे | भूताकेतावर विश्वास | मंत्रविद्येवर विश्वास | भविष्यावर विश्वास |
|---|---|---|---|---|---|
| १. | अशिक्षित | ६१ | ५८ | ५९ | ६१ |
| २. | प्राथमिक | ३५ | ३१ | ३१ | ३५ |
| ३. | माध्यमिक | ०३ | ०२ | ०२ | ०३ |
| ४. | महाविद्यालयीन | ०१ | ०० | ०० | ०१ |
| | एकूण .. | १०० | ९२ | ९२ | १०० |

वरील सारणीमध्ये ऊसतोडणी कामगारांचे शैक्षणिक दर्जा व धर्म, जादू आस्तित्व यावरील विश्वास यांचा संबंध पाहण्याचा प्रयत्न केला आहे. अशिक्षित ऊसतोडणी कामगारापैकी परमेश्वरावर विश्वास सर्वांचाच आहे हे

प्रमाण ६१% आहे. भुताखेतावर विश्वास असणारे ५८% तर मंत्रविद्येवर विश्वास असणारे ५९% आणि भविष्यावर विश्वास असणारे सर्वच म्हणजे ६१% ऊसतोडणी कामगार आहेत. प्राथमिक शिक्षण घेतलेल्या सर्वच ऊसतोडणी कामगारांचा परमेश्वरावर विश्वास आहे. परंतु ३१% कामगार भुताखेतावर विश्वास ठेवतात. ३१% मंत्रविद्येवर तर सर्वच म्हणजे ३५% भविष्यावर विश्वास ठेवतात. माध्यमिक शिक्षण घेतलेल्या ३% पैकी २% कामगारांना भूताखेतावर, मंत्रविद्येवर ३% कामगारांचा भविष्यावर विश्वास आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या १% ऊसतोडणी कामगारांचा परमेश्वर आस्तित्वावर आणि भविष्यावर विश्वास आहे. परंतु मंत्रविद्या व भूताखेतावर विश्वास नाही. एकंदरीत १००% लोकांचा परमेश्वर आस्तित्वावर ९१% लोकांचा भूताखेतावर, ९२% लोकांचा मंत्रविद्येवर, ९९%/ लोकांचा आणि भविष्यावर १००% कामगारांचा विश्वास आहे.

परमेश्वराचे आस्तित्व मानणा-या कामगारांचे सर्वच शैक्षणिक दर्जात सर्वात जास्त म्हणजे १००% प्रमाण आहे. तर भूताखेतावर विश्वास असणा-या कामगारांचे प्रमाण कमी म्हणजे ९१% आहे. माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्यांचा मंत्रविद्येवर व भूताखेतावर कमी विश्वास आहे. परंतु परमेश्वर आस्तित्व आणि भविष्य यावर मात्र त्यांचा विश्वास आहे.

एकंदरीत धर्म व जादू याबाबतीत ऊसतोडणी कामगारातील जास्त ~~शिक्षण~~ शैक्षणिक दर्जा असलेले व अगदीच अशिक्षित कामगार यांच्या मनाची अवस्था दोलायमान आहे असे म्हणावे लागेल. (येथे स्पष्टीकरण मांडताना धर्म व जादू यांच्यातला सूक्ष्म फरक लक्षात घेतलेला नाही. येथे जॉन्सनच्या विचाराचा आधार घेतला आहे. कारण जॉन्सनच्या मते मंत्रविद्या किंवा जादू धर्मव्यवस्थेचा एक भाग आहे.

४·४३ व्यसने आणि खर्च :

सारणी क्रमांक ४२

* व्यसने आणि खर्च (दरदिवशी) *

| क्रमांक | व्यसने खर्च | तंबाखू, पान | तंबाखू, पान व मद्यपान | अन्य | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १· | १ रु· पर्यंत | ६१ | -- | -- | ६१ |
| २· | १ ते २ रु· | ५ | -- | २ | ७ |
| ३· | २ ते ३ रु· | -- | २२ | -- | २२ |
| ४· | ३ ते ४ रु· | -- ( | -- | -- | -- |
| ५· | ४ रु·च्यावर | -- | -- | -- | --- |
| | एकूण ·· | ६६ | २२ | २ | ९० |

तंबाखू आणि पान या व्यसनावर १ रु·पर्यंत दरदिवशीचा खर्च असणारे ६१% ऊसतोडणी कामगार आहेत· याच व्यसनावर १ ते २ रु·पर्यंत खर्च असणा-या कामगारांचे प्रमाण ५% आहे· मद्यपानावर २ ते ३ रु· पर्यंत खर्च असणा-या कामगारांचे प्रमाण २२% आहे· १ ते २ रु·पर्यंत अन्य व्यसनावर खर्च करणा-या ऊसतोडणी कामगारांचे प्रमाण २% आहे· एकूण ६६% कामगार पानतंबाखूची व्यसने करतात· पान-तंबाखू बरोबरच मद्यपान करणा-या कामगारांचे प्रमाण २२% आहे· अन्य व्यसने करणा-या कामगारांचे एकूण प्रमाण २% आहे·

तंबाखू-पान व्यसन असलेल्या ऊसतोडणी कामगारांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ६६% आहे· तर अन्य व्यसने असलेल्या ऊसतोडणी कामगारांचे

प्रमाण सर्वात कमी म्हणजे २% आहे.

ऊसतोडणी कामगारामध्ये इतर ग्रामीण समाजातील शेतमजुराप्रमाणेच तंबाखू पान हे व्यसन अधिक प्रमाणात आढळते. मद्यपान व्यसनाचे २२% म्हणजे जवळ जवळ $\frac{१}{५}$ असे दिसते. थोडक्यात ऊसतोडणी कामगार व्यसनावर जास्त खर्च करू शकत नाही.

४.४४ मूळ गावाशी पत्रव्यवहार व त्यासाठी पत्ता :

सारणी क्रमांक ४३

* पत्रव्यवहार व पत्ता *

| क्रमांक | पत्रव्यवहारासाठी पत्ता | प्रमाण |
|---|---|---|
| १. | कामाच्या परिसरातील हॉटेल किंवा दुकानच्या पत्त्यावर | ३७ |
| २. | मुकादमाच्या पत्त्यावर | ३९ |
| ३. | कारखाना गेटच्या पत्त्यावर | ११ |
| ४. | अन्य | १३ |
| | एकूण .. | १०० |

कामाच्या ठिकाणच्या परिसरातील हॉटेल अथवा दुकानच्या पत्त्यावर पत्रव्यवहार करणा-या ऊसतोडणी कामगारांचे प्रमाण ३७% आहे. मुकादमाच्या पत्त्यावर पत्रव्यवहार करणा-यांचे प्रमाण ३९% आहे. कारखाना गेटच्या पत्त्यावर पत्रव्यवहार करणा-या कामगारांचे प्रमाण ११% आहे. अन्य पत्त्यावर पत्रव्यवहार करणा-या कामगारांचे प्रमाण १३% आहे.

सर्वात जास्त प्रमाण मुकादमाच्या पत्त्यावर पत्रव्यवहार करणा-या कामगारांचे आहे·(३९%) तर सर्वात कमी प्रमाण कारखाना गेटच्या पत्त्यावर पत्रव्यवहार करणा-या कामगारांचे आहे·(११%)

ऊसतोडणी कामगारांना पत्रव्यवहारासाठी पत्ता देताना अनेक अडथळे येत असतात· जे कारखान्यापासून दूर काम करतात· त्यांना परिसरातील दुकानांच्या पत्त्यावर पत्रव्यवहार करण्याची सुविधा शोधावी लागते· पत्रव्यवहाराच्या पत्त्यासाठी सुध्दा त्यांना मुकादमावर अवलंबून रहावे लागते·

४·४५ स्थानिक लोकांशी व्यवहार :


सारणी क्रमांक ४४

* स्थानिक लोकांशी व्यवहार *

| क्रमांक | बाब | व्यवहार करणारे | व्यवहार न करणारे | एकूण |
|---|---|---|---|---|
| १· | उसने देणे घेणे | १२ | ८८ | १०० |
| २· | उधारीचे व्यवहार | ५७ | ४३ | १०० |
| ३· | कर्ज देणे घेणे | ०३ | ९७ | १०० |

वरील सारणीमध्ये उसने देणे-घेणे व्यवहार स्थानिक लोकांशी करणा-या कामगारांचे प्रमाण १२% आहे· तर उधारीचे व्यवहार करणा-यांचे प्रमाण ५७% आहे· तर कर्ज देणे-घेणेचे व्यवहार करणा-यांचे प्रमाण ०३% आहे·

कर्ज देणे घेणे या व्यवहाराचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे ०३% आहे· तर उधारीचे व्यवहार करणा-यांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ५७% आहे·


* स्थानिक लोकांशी व्यवहार *
सूची-
व्यवहार न करणारे
व्यवहार करणारे
प्रमाण 1 सें.मी. = ५
१००
९५
९०
८५
८०
७५
७०
६५
६०
५५
५०
४५
४०
३५
३०
२५
२०
१५
१०
५

उधारीचे व्यवहार करण्याशिवाय या कामगारांना गत्यंतर उरत नसल्याने हे कामगार हे व्यवहार जास्त प्रमाणात करत असावेत. स्थानिक लोकांशी वरील पैकी अन्य व्यवहार करणा-यांचे प्रमाण अगदीच नगण्य आढळते.

४.४६ करमणुकीच्या सुविधा :

सारणी क्रमांक ४५

* करमणुकीच्या सुविधा *

| क्रमांक | करमणुकीच्या सुविधा | प्रमाण |
|---|---|---|
| १. | परिसरातील यात्रा व बाजार | १२ |
| २. | कारखान्याकडून खास सुविधा | 00 |
| ३. | आपसात साजरे केलेले पारंपारिक कार्यक्रम, लोकगीते इ. | २२ |
| ४. | अन्य | 0७ |
| | एकूण .. | ४१ |

परिसरातील यात्रा व बाजारातून करमणूक सुविधांचा लाभ घेणारांचे प्रमाण १२% आहे. काम करताना पारंपारिक लोकगीते, भारुडे म्हणून करमणूक करुन घेणारांचे प्रमाण २२% आहे. तर अन्य मार्गाने करमणूक सुविधा उपलब्ध करुन घेणारांचे प्रमाण 0७% आहे.

पारंपारिक पध्दतीच्या करमणुक साधनांचा वापर करणारांचे २२% हे प्रमाण सर्वात जास्त आहे. तर अन्य मार्गाने करमणूक करुन घेणारांचे प्रमाण ७%

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

हे सर्वात कमी आहे.

ऊसतोडणी कामगारांना करमणुकीच्या सुविधेची कोणतीही व्यवस्था नाही असेच आपणाला दिसून येते. एकूण ५९% लोक करमणुकीच्या सोयीपासून **पूर्णपणे** वंचित राहिले आहेत.

=0=0=0=0=0=

संदर्भ :

१. "मायग्रंट वर्कर्स - सुपर एक्स्प्लॉयटेशन अँन्ड आयडेंटीडी- केस ऑफ शुगरकेन कटर्स इन गुजराथ " ४ जून,१९८८ डी.एन.इकॉनॉमीक अँन्ड पॉलीटिकल विकली, ए समिक्षा ट्रस्ट पब्लीकेशन व्हॅल्युम नं.२३

२. तत्रैव - इक्ले पृष्ठ

३. डॉ.चित्रा नाईक, १९८८ " प्रौढ शिक्षण कां १ आणि कसे १ ४ थी आवृत्ती, पुणे, इंडियन इन्स्टीटयूट ऑफ एज्युकेशन पृष्ठ-३.

४. ना.वा.ढवळे, ९ मे,१९८८, " साधी माणस " - कोल्हापूर दै.सकाळ - संपादक दै.सकाळ.

५. व्ही.एम.दांडेकर/ निलकंठ रथ, १९७१ पॉव्हर्टी इन इंडीया पुणे गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलीटिक्स अँन्ड इकॉनॉमिक्स, पृ.१३०

६. ना.वा.ढवळे, १७ नोव्हेंबर,१९८८ "ऊसतोडणी व वाहतूक कामगारांचा प्रश्न गंभीर " कोल्हापूर दै.सकाळ, संपादक - दै.सकाळ.

७. तत्रैव -

८. आर.सी.सक्सेना, लेबर प्रॉब्लेम्स अँन्ड सोशल वेलफेअर, पृष्ठ ६५१.

९. डॉ.पुष्प ल.भांडारकर/प्रा.नि.स.वैद्य, १९७५ समाजशास्त्रीय सिध्दांत नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मीती मंडळ, पृष्ठ २७०

१०. सुरेश शिंदे, १९८५,साखरशाळा, पुणे सुगाव प्रकाशन पृ. १ ते ५.

११. सांगली जिल्हा परिषदेचे १९८६-८७ चे सतत गैरहजर मुलांना पटावरून कमी करणेचे धोरण.

=0=0=0=0=0=